मेहता मराठी ग्रंथजगत

डिसेंबर, २०२२
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष बाविसावे
अंक बारावा

राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन (१९८४ पासून) २ डिसेंबर

वाढत्या प्रदूषणाला
आळा घालू,
आपलं पर्यावरण
नेटानं सांभाळू...

पुरस्कारासाठी आवाहन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

सर्वोत्कृष्ट कादंबरी – ३०,०००/-

सर्वोत्कृष्ट कथासंग्रह – २०,०००/-

पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली जाणार असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य दिलेल्या पत्त्यावर पाठवावे.

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ डिसेंबर २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक बारावा

संपादक :
अखिल मेहता

संस्थापक संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
पूजा भडांगे

अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

— अनुक्रमणिका —

संपादकीय	**४**
एक एक पान घडताना...	**१८**
पुरस्कार	**२४**
प्रकाशन	**२६**
श्रद्धांजली	**२७**
प्रासंगिक	**२८**
पुस्तक परिचय	
माझा आनंद	३२
अ-अमिताभचा	३४
मोहनस्वामी	३६
दि व्हॉल्ट ऑफ विष्णू	३८
चाणक्याचा मंत्र	४२
टेल टेल	४४
द इलेव्हन्थ कमान्डमेन्ट	४६
नाते ब्रह्मांडाचे	४८
मार्क ट्वेनच्या निवडक कथा	५०
मराठी दौलतीचे नारी शिल्प	५२
खुजाबा	५६
दिनविशेष	**६०**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

संपादकीय

मागे वळून पाहताना...

दिवस, महिने, वर्षं, शतकं जसजशी संपत जातात तसतशी भूतकाळाची खोली अनुभवांनी गच्च भरून जाते. काळाला उलटून गेलेले सगळे क्षण इतिहासजमा होतात. काही आठवणीत राहतात तर काही आपल्या हातून निसटून जातात. मेहता पब्लिशिंग हाऊससाठी २०२२ची सुरुवात अतिशय क्लेशदायक ठरली. गेली साडेतीन दशकं ज्या नावाचं गारूड प्रकाशन विश्वात कायम राहिलं, ज्या नावाने मेहतांचा डोलारा समर्थपणे सांभाळत कंपनीचं नाव सातासमुद्रापार नेलं अशा आपल्या सुनील मेहता यांच्या जाण्याने काळ थांबल्यासारखा झाला होता. त्यांच्या पश्चात मेहता पब्लिशिंग हाऊसची धुरा तितक्याच नेटाने चालवणं अत्यंत जोखमीचं काम होतं. गेले ११ महिने त्यांच्या आठवणीसहित, त्यांनी आखून दिलेल्या मार्गावर चालण्याचा आम्ही प्रयत्न करतोय. मेहता मराठी ग्रंथजगत हे मासिक असो वा दरवर्षी येणारा दिवाळी अंक, ऑक्टोबरमधील पुस्तक प्रदर्शन असो वा विविध पुस्तकांचे देखणे प्रकाशन समारंभ, सगळ्याच गोष्टी जश्याच्या तश्या, कुठेही खंड पडू न देता सुरू आहेत; कमी आहे ती सुनील मेहता यांची; पण तेही प्रत्येक महिन्यात प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाच्या पानांतून आमच्यासोबत जोडले गेले आहेत या विश्वासावर पुढेही मेहता पब्लिशिंग हाऊस अश्याच उर्मीने आणि जिद्दीने सगळ्या वाचकांसाठी उत्तमोत्तम पुस्तके घेऊन येत राहील असा विश्वास देतो.

हे वर्ष उजाडतानाच अनेक आव्हानं समोर उभी होती. त्यांना सामोरं जात पुन्हा नव्या जोमानं आम्ही प्रकाशनाची

वाटचाल सुरू ठेवलीय. जानेवारी महिन्याच्या अखेरीस 'एके दिवशी' ह्या गिरीश वालावलकर लिखित कादंबरीचं प्रकाशन मा. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते राजभवनात केलं, तर सुनील मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेली आणि अंतिम निर्णयापर्यंत आलेली शेवटची २६ पुस्तके त्यांना समर्पित केली. मेहता पब्लिशिंग हाऊसचा अत्यंत महत्त्वाचा हिस्सा असलेले लेखक म्हणजे पद्मश्री रणजित देसाई. पहिला सेलिब्रिटी लेखक म्हणून मराठी मनात नावलौकिक असलेल्या 'स्वामी'कार रणजित देसाई यांना आपल्यातून जाऊन यंदा ३० वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देणाऱ्या अनेक आठवणी सर्व वाचकांना एकत्रित वाचता याव्यात या हेतूने मार्च महिन्याचा 'मेहता मराठी ग्रंथजगत'चा अंक रणजित देसाई यांना समर्पित करण्यात आला होता.

नाशिकनंतर लगेचच ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उदगीर येथे रंगले. २२ ते २४ एप्रिल असे तीन दिवस भरगच्च कार्यक्रमांनी रंगलेले मेहता पब्लिशिंग हाऊसचे, साहित्य संमेलनातील पुस्तक दालन नेहमीप्रमाणेच लक्षवेधी ठरले. आपण केवळ ग्रंथविक्री किंवा ग्रंथप्रदर्शन इतकाच हेतू न बाळगता वाचक आणि लेखकांचा थेट संवाद घडवून आणण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतो. त्यानुसार अनेक मान्यवरांचे परिसंवाद, चर्चा, मुलाखती, नवीन पुस्तकांचे प्रकाशन असा भरगच्च कार्यक्रम आखण्यात आला. ज्यामध्ये पद्मश्री लक्ष्मण माने यांच्या 'किटाळ' या पुस्तकाची सुधारित आवृत्ती लेखकाच्याच हस्ते प्रकाशित केली गेली तर सुप्रसिद्ध बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या 'खळाळता अवखळ झरा' या बालकथासंग्रहाचे देखील प्रकाशन झाले. महाकादंबरीकार विश्वास पाटील यांच्या 'महासम्राट' या कादंबरीचा पहिला खंड अर्थात 'झंझावात' या पुस्तकाचा प्री-बुकिंग सोहळा देखील या ठिकाणी संपन्न झाला. उदगीरमधील शालेय विद्यार्थ्यांना आपले लाडके लेखक श्री. विश्वास पाटील यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. तत्पूर्वी १२ एप्रिल, २०२२ रोजी मा. विश्वास पाटील यांच्या 'महासम्राट' या कादंबरीचा हस्तलिखित हस्तांतरण सोहळा मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तक दालनात संपन्न झाला. या वेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

यशाच्या अनेक पायऱ्या सर करत, प्रत्येक दिवसाला आयाम देणारं व्यक्तिमत्त्व म्हणजे आयएएस अधिकारी विजय अमृता कुलांगे. कुलांगे यांचे 'आजचा दिवस माझा' हे अतिशय प्रेरणादायी पुस्तक नुकतेच आपल्याकडून

प्रकाशित झाले आहे. १७ एप्रिल रोजी या लेखकानेही मेहता पब्लिशिंग हाऊसला स्नेहभेट दिली. या संपूर्ण वर्षभरात विविध उपक्रमांसोबत असंख्य पुस्तकं आणि अनेक दिमाखदार प्रकाशन सोहळेदेखील पार पडले. अनेक लेखकांचा आणि वाचकांचा संवाद आम्हाला घडवून आणता आला. ज्यामध्ये सगळ्यात पहिलं नाव होतं ते म्हणजे ज्येष्ठ लेखक एस. एल. भैरप्पा यांचं. भैरप्पा लिखित आणि उमा कुलकर्णी अनुवादित 'गृहभंग' या कादंबरीचा प्रकाशन सोहळा २० मार्च रोजी पार पडला. त्यानंतर २६ मार्च रोजी ज्येष्ठ मराठी लेखक व. पु. काळे यांच्या ९०व्या जयंतीचे औचित्य साधून व. पु. काळे लिखित 'गोफ' आणि 'वपुं'च्या कन्या स्वाती चांदोरकर लिखित 'तोड' या दोन्ही पुस्तकांचा प्रकाशन सोहळा थाटात संपन्न झाला. राजपुत्र सिद्धार्थ ते तथागत गोतम या दीर्घ मनोप्रवासाचं चित्रण करणाऱ्या, वसंत गायकवाड लिखित 'तथागत गोतम बुद्ध' या कादंबरीचे प्रकाशन दि. १६ मे रोजी कोल्हापूर येथे झाले. आबालवृद्धांच्या लाडक्या लेखिका मा. सुधा मूर्ती यांच्या 'दोन शिंगे असलेला ऋषी' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मा. सुधाताईंनी पुणेकर वाचकांची भेट घेतली. प्रेक्षकांच्या अलोट गर्दीत २७ मे रोजी पुण्यातल्या टिळक स्मारक मंदिर येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. कन्नड आणि मराठी भाषेचा संवादपूल बांधणाऱ्या अनुवादक उमा कुलकर्णी यांच्या 'संवादु-अनुवादु' या आत्मकथनाचे कन्नडमधील भाषांतरही प्रकाशित झाले. डॉ. उमा रामराव यांनी या मूळ मराठी पुस्तकाचे कन्नड भाषांतर केले आहे.

पद्मश्री लक्ष्मण माने यांच्या 'किटाळ' या पुस्तकाची सुधारित आवृत्ती दि. १ जून रोजी प्रकाशित करण्यात झाली. या कार्यक्रमाला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव, प्रसिद्ध पत्रकार निखिल वागळे, ॲड. जयदेव गायकवाड आणि अरुण खोरे उपस्थित होते. महाराष्ट्रातल्या राजकीय इतिहासाला विलक्षण कलाटणी देणारे बंड मधल्या काळात घडले. या महाबंडाचा सखोल आढावा घेणारे ज्येष्ठ पत्रकार श्री. जितेंद्र दीक्षित लिखित 'ते ११ दिवस - महाराष्ट्रातील महाबंड' या पुस्तकाचे प्रकाशन आणि पहिली प्रत मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आली. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर यांनी कोल्हापूर संस्थानच्या छत्रपती शाहू महाराज यांच्या स्नुषा आणि सासवडच्या जगताप या राजघराण्यातील शंकरराव खाशाबा जगताप यांच्या कन्या राणी इंदुमती राणीसाहेब यांच्यावरील पुस्तकाची संहिता मेहता पब्लिशिंग हाऊसच्या रूपा मेहता यांच्याकडे सुपूर्द केली. हे पुस्तकही नुकतंच प्रकाशित झालं आहे.

धगधगत्या काश्मीरचा अंतर्गत कोलाहल मांडणाऱ्या कन्नड लेखिका सहना विजयकुमार लिखित आणि उमा कुलकर्णी अनुवादित 'कशीर' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळाही पार पडला. या निमित्ताने उमाताई आणि सहनाजी यांनी वाचकांशी मनमोकळा संवाद साधला. भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करू इच्छिणाऱ्या धोरणावर अभ्यासपूर्वक भाष्य करणाऱ्या 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' या पुस्तकाचेही प्रकाशन पार पडले.

अभिनेते प्रसाद ओक यांच्या अभिनय कारकिर्दीतील टर्निंग पॉइन्ट असलेल्या 'धर्मवीर' या चित्रपटाच्या पडद्यामागची कथा सांगणाऱ्या 'माझा आनंद' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळादेखील ३० सप्टेंबर, २०२२ रोजी पुण्यातल्या एस. एम. जोशी सभागृहात पार पडला. दरवर्षी आपण ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत असतो तो क्षण म्हणजे आपले वार्षिक ग्रंथप्रदर्शन. या वर्षी १ ते १० ऑक्टोबर या काळात हे पुस्तक प्रदर्शन उत्साहात पार पडलं. सुधा मूर्ती यांनी तब्बल १२ वर्षांनी सांगलीकर वाचकांशी संवाद साधला. मेहता पब्लिशिंग हाऊसने ७ नोव्हेंबर रोजी सांगलीच्या विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात चाहत्यांनी अलोट गर्दी केली होती.

आपल्या लेखकांचं होणारं कौतुक, त्यांना मिळणारे मानसन्मान हे नेहमीच आनंददायी असतात. आपले ज्येष्ठ लेखक निरंजन घाटे यांना यावर्षी 'मसाप जीवनगौरव पुरस्कार' तर महाकादंबरीकार विश्वास पाटील यांना 'अण्णा भाऊ साठे पुरस्कार' प्रदान करण्यात आला. मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक श्री. अनिल मेहता यांनाही दिलीपराज प्रकाशनातर्फे 'ग्रंथोत्तेजक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वर्षाच्या शेवटच्या महिन्यात पाऊल ठेवताना प्रकाशित केलेली पुस्तके, हाती घेतलेले उपक्रम, नव्या पुस्तकांवर सुरू असलेली कामे, असा सगळाच पट डोळ्यांसमोर एकत्रितपणे उभा आहे. येत्या वर्षापासून श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नवोदित लेखकांना प्रोत्साहन मिळावं म्हणून पुरस्कारसुद्धा जाहीर करण्यात येणार आहे. त्याची सविस्तर माहिती या मासिकात आहेच. आशा आहे की त्यांची आठवण आणि शिकवण पुढील काळातही आमच्यासाठी प्रेरणादायी ठरेल आणि पुढेही अनेक उत्तमोत्तम पुस्तकांसह आम्ही तुमच्या भेटीला येतच राहू. येणारे नवे वर्ष आपल्या सर्वांसाठी आनंददायी जावो, याच सदिच्छा.

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छपील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये

Available on

play.google.com / store / books

www.amazon.in

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाइल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स ॲप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

मेहता पब्लिशिंग हाऊस

amazon

GET IT ON Google play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स... **eBooks**

www.amazon.in

play.google.com

https://books.apple.com

Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com

२०२२ मधील प्रकाशित पुस्तके

कादंबरी

दोस्ती दुनियादारी और दिल	मंजुश्री गोखले	२२०
स्थलांतर	उमेश कदम	२१०
धर्मवेध	ल.सि. जाधव	४५०
एके दिवशी	डॉ. गिरीश वालावलकर	२२०
मायटिअर दॅन द स्वोर्ड : जेफ्री आर्चर	अनु.लीना सोहोनी	६६०
कमेथ् द अवर : जेफ्री आर्चर	अनु.लीना सोहोनी	६६०
हम्बर बॉय बी : रुथ डगदाल	अनु. सई साने	४५०
द ब्रिज ऑन द रिव्हर क्वाय : पीअर बाऊल	अनु. आनंद ठाकूर	२२०
गृहभंग : एस. एल. भैरप्पा	अनु. उमा कुलकर्णी	४९०
उदयास्त : सहना विजयकुमार	अनु. अपर्णा नायगावकर	४९०
ॲम्नेस्टी : अरविंद अडिगा	अनु. सुनीता कट्टी	३५०
तोड	स्वाती चांदोरकर	२००
जोहड	सुरेखा शहा	३५०
हाल्या हाल्या दुधू दे!	बाबाराव मुसळे	२६०
शगी बेन : डग्लस स्टुअर्ट	अनु. डॉ.शुचिता नांदापूरकर-फडके	६३०
भक्तिचंद्र	मंजुश्री गोखले	४८०
पिढी दर पिढी : पर्ल बक	अनु. भारती पांडे	४४०
तथागत गोतम बुद्ध	वसंत गायकवाड	१४००
क्रिमिनल्स इन यूनिफॉर्म : संजय सिंग । राकेश त्रिवेदी	अनु. मुकुंद कुळे	३५०
हाउ टू किडनॅप द रिच : राहुल रैना	अनु. अक्षय कुऱ्हे	३५०
अमृतयात्रा : दिनकर जोषी	अनु. अनघा प्रभुदेसाई	२३०
द्वारकेचा सूर्यास्त : दिनकर जोषी	अनु. अनघा प्रभुदेसाई	१६०
परतुनि ये घनश्याम : दिनकर जोषी	अनु. स्मिता भागवत	२६०
प्रश्नप्रदेशापलीकडे... : दिनकर जोषी	अनु. अनघा प्रभुदेसाई	३४०
प्रकाशाची सावली : दिनकर जोषी	अनु. स्मिता भागवत	३४०
प्रतिनायक : दिनकर जोषी	अनु. स्मिता भागवत	७२०

कृष्णं वन्दे जगद्गुरुम् : दिनकर जोषी	अनु. सुषमा शाळिग्राम	१८०
उत्तुंग	मृणालिनी सावंत	७९०
महासम्राट	विश्वास पाटील	६२५
द इलेव्हन्थ कमान्डमेन्ट : जेफ्री आर्चर	अनु. मोहन गोखले	६००
दि व्हॉल्ट ऑफ विष्णू : अश्विन सांघी	अनु. संकेत लाड	४९५
चाणक्याचा मंत्र : अश्विन सांघी	अनु. दीपक कुळकर्णी	५४५
शुभमंगल	भा.द. खेर	२२०
सुखाचा लपंडाव	भा. द. खेर	२५०
सेतुबंधन	भा. द. खेर	३२०
गाव तेथे देव	भा. द. खेर	२५०
बर्लिन गंगेला मिळाले	भा. द. खेर	१८०
फेलानी : अरूपा पतंगिया कलिता	अनु. मेघना ढोके	४५०
छोटा देश : गाएल फाई	अनु. आकांक्षा आठल्ये	२५०
शल् वी टेल द प्रेसिडेंट? : जेफ्री आर्चर	अनु. स्नेहा केतकर	४५०
ऑनर अमंग थीव्हज : जेफ्री आर्चर	अनु. सई साने	७००
द वुमन इन द विंडो : ए. जे. फिन	अनु. सावनी केळकर	६३०
ड्रीम्स ऑफ जॉय : लिसा सी	अनु. सुनंदा अमरापूरकर	६३०
रहस्य प्राचीन नटराजाचे : राधिका नाथन	अनु. डॉ. मीना शेटे-संभू	५२०
पाव्हणा	महादेव मोरे	१५०
बळी	महादेव मोरे	२२०
रैत	महादेव मोरे	२५०
इश्क @ मांडवी	मिलिंद महांगडे	२९०
श्री गजानन दर्शन	भा. द. खेर	३९०
लोकमान्य टिळक दर्शन	भा. द. खेर	४८०
संजीवन	भा. द. खेर	२५०
द प्रॉडिगल डॉटर : जेफ्री आर्चर	अनु. डॉ. देवदत्त केतकर	७००
द डे ऑफ द जॅकल : फ्रेडरिक फोरसाइथ	अनु. स्वाती देशपांडे	७५०

'अमेरिकन' क्लासिक्स (अनुवाद/रूपांतर)

मार्क ट्वेनच्या निवडक कथा : मार्क ट्वेन	अनु. रोहिणी बागल	३००

सत्यकथा

एव्हरेस्ट १९५३ : मिक कॉनफ्रे	अनु. विनीता जोगळेकर	४२०
१९१२ अंटार्क्टिकाच्या शोधात : ख्रिस टर्नी	अनु. मोहन गोखले	४५०

कथासंग्रह

ऐसी अक्षरे	मैत्रेयी जोशी	२१०
डेस्टिनेशन	प्रा. पुरुषोत्तम रामदासी	२१०
बाईची गोष्ट	प्रा.पुरुषोत्तम रामदासी	३००
अजून नाही जागी राधा	स्नेहलता जोशी	२१०
कुलामामाच्या देशात	जी.बी. देशमुख	२००
दोन शिंगे असलेला ऋषी : सुधा मूर्ती	अनु. लीना सोहोनी	२२०
कांद्याचा वांधा	नंदिनी देशमुख	२००
झांझिबारी मसाला	उमेश कदम	२५०
टेल टेल : जेफ्री आर्चर	अनु. लीना सोहोनी	३५०
मोहनस्वामी : वसुधेंद्र	अनु. डॉ.डी.व्ही. अरवंदेकर	३३०
ऋणानुबंध	सुनीता देवस्थळी	२३०
सापशिडी	स्वाती चांदोरकर	२००
तुझी कथा माझे शब्द	महादेव मोरे	१५०
गब्रू	महादेव मोरे	२२०

अनुभवकथन

किटाळ	लक्ष्मण माने	३२०
गोवा... मला दिसलेला	सुधीर देशपांडे	२३०
निर्भय प्रशासन : किरण बेदी	अनु. सुप्रिया वकील	४४०
द लॉस्ट सिटी ऑफ Z : डेव्हिड ग्रान	अनु. मंदार गोडबोले	४७०

आत्मकथन

आजचा दिवस माझा	विजय अमृता कुलांगे	२९५
कास्ट मॅटर्स : डॉ. सुरज मिलिंद एंगडे	अनु. प्रियांका तुपे । प्रणाली एंगडे	४२५
उपरा	लक्ष्मण माने	२२०
माझा आनंद	प्रसाद ओक	२५०
निर्जन पूल : कोंडापल्ली कोटेश्वराम्मा	अनु. शर्मिला इनामदार	२५०

व्यक्तिचित्रसंग्रह

व्यक्तिवेध : शरद पवार ते गोविंद पानसरे	डॉ. जयसिंगराव पवार	२२०

क्रीडाविषयक

द ग्रेट तमाशा : जेम्स ॲस्टिल	अनु. सुदर्शन आठवले	५५०

इतिहासपर

सम्राज्ञी : महाराणी व्हिक्टोरिया आणि भारत : माइल्स टेलर	अनु. वर्षा वेलणकर	६५०
अराजक : विल्यम डॅलरिंपल	अनु. रेश्मा कुलकर्णी-पाठारे	७९५
मराठी दौलतीचे नारी शिल्प	गोपाळ देशमुख	२९०
करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब	डॉ.सुवर्णा नाईक निंबाळकर	३१०

मार्गदर्शनपर

मार्ग आत्मविश्वासाचा : रॉस टेलर	अनु. श्याम भुर्के	२२०
भगवद्गीता : रूपा पै	अनु. लीना सोहोनी	३५०
बोलबच्चन : रुपेश दुबे	अनु. मंजुषा मुळे	२५०
कॉर्पोरेट कबीर : गुरुचरण सिंग गांधी	अनु. सायली गोडसे	३००
द आर्ट ऑफ क्रिएटिव्ह थिंकिंग : रॉड जड्किन्स	अनु. डॉ. शकुंतला कोलारकर	४१०
द अल्टिमेट हॅपिनेस प्रिस्क्रिप्शन : दीपक चोप्रा	अनु. सुमिता बोरसे	१६०

चिकन सूप मालिका

चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, रक्षा भारदिया	अनु. अवंती महाजन	२५०
चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स भाग २ : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, रक्षा भारदिया	अनु. अवंती महाजन	२५०
चिकन सूप फॉर इंडियन डॉक्टर्स सोल : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, रक्षा भारदिया	अनु. जोसेफ तुस्कानो	२२०
चिकन सूप फॉर इंडियन डॉक्टर्स सोल भाग २ : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, रक्षा भारदिया	अनु. जोसेफ तुस्कानो	२२०
चिकन सूप फॉर द सोल ऑल इन द फॅमिली : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन	अनु. सुनिता कट्टी	२८०

चिकन सूप फॉर द सोल ऑल इन द फॅमिली भाग २
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. सुनिता कट्टी २८०
चिकन सूप फॉर द सोल काउंट युअर ब्लेसिंग्ज
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. शुभदा अभ्यंकर २६०
चिकन सूप फॉर द सोल काउंट युअर ब्लेसिंग्ज भाग २
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. शुभदा अभ्यंकर २६०
चिकन सूप फॉर द सोल ऑन फ्रेंडशिप
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. डॉ. पूर्णिमा मालशे२४०
चिकन सूप फॉर द सोल ऑन फ्रेंडशिप भाग २
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. डॉ. पूर्णिमा मालशे२४०
चिकन सूप फॉर द सोल शेपिंग द न्यू यू
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. शुभदा विद्वांस ३२०
चिकन सूप फॉर द सोल शेपिंग द न्यू यू भाग २
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. शुभदा विद्वांस ३२०
चिकन सूप फॉर द सोल माय रेझोल्युशन
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. वैशाली रानडे २५०
चिकन सूप फॉर द सोल माय रेझोल्युशन भाग २
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. वैशाली रानडे २५०
चिकन सूप फॉर द सोल न्यू मॉम्स
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. प्राजक्ता चित्रे २५०
चिकन सूप फॉर द सोल न्यू मॉम्स भाग २
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. प्राजक्ता चित्रे २५०
चिकन सूप फॉर द इंडियन सोल टीन्स टॉक रिलेशनशिप्स
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. शीला कारखानीस २४०
चिकन सूप फॉर द इंडियन सोल टीन्स टॉक रिलेशनशिप्स भाग २
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन अनु. शीला कारखानीस २४०

माहितीपर

हिमालयारण्यक : स्टीफन ऑल्टर अनु. आश्लेषा गोरे ६५०

आरोग्यपर

चला जाणून घेऊ या : (Menopause) ऋतुजा
डॉ. अंजुश्री मेटकर ८०

लेखसंग्रह

आज़ादी : अरुंधती रॉय	अनु. प्रविण अक्कानवरू	२५०
पालावरचं जग	लक्ष्मण माने	२८०
खेळ साडेतीन टक्क्यांचा	लक्ष्मण माने	३००

वैचारिक

कृष्णरंग सावळा : ओशो	अनु. स्वाती चांदोरकर	२७०
कृष्णसखा : ओशो	अनु. स्वाती चांदोरकर	२७०
कृष्णामृत : ओशो	अनु. स्वाती चांदोरकर	२७०
चक्र ते चरखा : दिनकर जोषी	अनु. सुषमा शाळिग्राम	२७०
भारतीय संस्कृतीचे सर्जक : दिनकर जोषी	अनु. अनघा प्रभुदेसाई	२५०

ललित

ध्यासपर्व	मधुवंती सप्रे	२५०
अ-अमिताभचा	जी. बी. देशमुख	२८०

नाटक

पानिपतचे रणांगण	विश्वास पाटील	१८०

एकांकिकासंग्रह

गोफ	व. पु. काळे	२२०

संशोधनात्मक

युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी	डॉ. जयसिंगराव पवार	१७०
शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना	डॉ. जयसिंगराव पवार	२००
राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय	डॉ. जयसिंगराव पवार	२००
दादाजी कोंडदेव कोण होता ?	डॉ. जयसिंगराव पवार	१७०

शैक्षणिक

राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० - चिकित्सा	प्रा.डॉ. भालबा विभुते	२३०

राजकीय

महाराष्ट्रातील महाबंड... : जीतेंद्र दीक्षित	अनु. डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके	२५०

विज्ञानविषयक

नाते ब्रह्मांडाचे : जो मर्चंट	अनु. लीना दामले	५५०

विज्ञान कथासंग्रह

भिंतींना जिभाही असतात	डॉ. बाळ फोंडके	३२०
खुजाबा	डॉ. संजय ढोले	३३०

विज्ञान कादंबरी

प्लॅटोन	डॉ. संजय ढोले	५९५
जॉर्ज ॲन्ड द ब्ल्यू मून : ल्यूसी/स्टीफन हॉकिंग	अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर	३९५
जॉर्ज ॲन्ड द शिप ऑफ टाइम : ल्यूसी/स्टीफन हॉकिंग	अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर	३९५
जॉर्ज ॲन्ड द अनब्रेकेबल कोड : ल्यूसी/स्टीफन हॉकिंग	अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर	३९५

बालसाहित्य

खळाळता अवखळ झरा	एकनाथ आव्हाड	१९५
सू सू अंतराळवीर (बब्बड मालिका)	राजीव तांबे	
रंगीत घोटाळा (बब्बड मालिका)	राजीव तांबे	

(२ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत २८०/-)

कुमारसाहित्य

अम्मा, मला शिर्डीला घेऊन चल! : भक्ती माथुर	अनु. वृषाली पटवर्धन	१९५
अम्मा, मला सलीम चिश्तींच्या दर्ग्याला घेऊन चल! : भक्ती माथुर	अनु. वृषाली पटवर्धन	१९५
अम्मा, मला सुवर्णमंदिर दाखव : भक्ती माथुर	अनु. वृषाली पटवर्धन	१९५
अम्मा, चल तिरुपतीला जाऊ! : भक्ती माथुर	अनु. वृषाली पटवर्धन	१९५
राजा, कबुतर आणि वृद्ध व इतर कथा	ज्ञानदा नाईक	१९५
सोन्याचं कडं व इतर गोष्टी	ज्ञानदा नाईक	१९५
नेतृत्वनिर्मिती : डॉ. किरण बेदी	अनु. सुप्रिया वकील	२५०

◆

एक एक पान घडताना...

– अनिल मेहता

पुस्तक प्रकाशन व्यवसाय वाढवताना बऱ्याच मुद्द्यांवर विचार करून, धोरणं आखून त्यानुसार पावलं उचलावी लागतात. पुस्तकांची किंमत, लेखकाचं मानधन यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टीविषयी अनिल मेहता आणि मेहता पब्लिशिंग हाऊस सुरुवातीपासूनच किती ठाम आणि आग्रही आहे हे सर्वांना ठाऊकच आहे. त्याविषयी सविस्तर माहिती देणारा हा विशेष लेख जरूर वाचा.

१३

मराठी प्रकाशन क्षेत्राचे 'नाजूक' पैलू

अ) पुस्तकांच्या किमती

मराठी पुस्तकांच्या किमती वाजवीपेक्षा जास्त असतात. काही प्रकाशक वाचकाला चकवण्यासाठी, ग्राहकाला खोटे समाधान देण्याची युक्ती म्हणून पुस्तकांच्या किमती भरमसाट ठेवतात आणि आलेल्या ग्राहकाला कागदोपत्री भरपूर सूट देऊन पुस्तक त्याच्या गळ्यात बांधतात. ग्रंथालयाच्या गिऱ्हाइकांनाही जास्तीत जास्त 'कमिशन' मिळणारीच पुस्तकं हवी असतात. अशा वेळी ही भरमसाट किमती असलेली पुस्तकं भरपूर कमिशन देऊन गळ्यात बांधली जातात.

फालतू पुस्तकं प्रसिद्ध करणारे, केवळ धंद्याला बसलेले प्रकाशक आणि पुस्तकांची अंतरंग–योग्यता लक्षात न घेता केवळ पुस्तकांची संख्या ग्रंथालयात वाढवणारे ग्रंथालयाशी सबंधित असलेले, पण ग्रंथवाचनाशी काडीचाही संबंध नसलेले राजकारणी लोक यांची अशी दुष्ट युती होऊन अर्थव्यवहार चालतो. या व्यवहारात अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करून पैसा ढापला जातो. नंबर दोनचा बनवाबनवीचा धंदा केला जातो. ग्रामीण विभागातील बऱ्याचशा ग्रंथालयांत असल्या प्रकारची सामान्य पुस्तकं प्रामुख्यानं भरली जातात. तेथील वाचक वर्गाला चांगल्या पुस्तकांपासून अशा रीतीनं वंचित ठेवलं जातं; पण बरेच नामवंत प्रकाशक आपल्या पुस्तकाच्या किमती योग्य त्या ठेवून योग्य ते डिस्काउन्ट देत असतात. असे अनेक मोठमोठे प्रकाशक माझ्या पाहण्यात आहेत की ज्यांच्या पुस्तकांच्या किमती अत्यंत वाजवी असतात व त्याचा उपयोग ग्राहकाला होतो.

हल्ली बरीच नवनवीन पॉलिटेक्निक कॉलेजेस, इंजिनिअरिंग कॉलेजेस उघडतायेत. त्यासाठी पुस्तकांची खरेदी होते. ती मंडळी जास्तीत जास्त सवलत कशी मिळेल हे पाहत असतात. त्यांच्या ठिकाणी राहून विचार केला तर ते चुकीचं वाटत नाही; पण अशा ग्राहकांना, ग्रंथपालांना किंवा प्राचार्यांना स्वस्त किंवा सवलतीच्या पुस्तकांमागील गौडबंगाल माहीत नसतं. जास्त पुस्तकं घेतली की आपला जास्त फायदा झाला. आपल्याला जास्त सवलत मिळाली असं त्या लोकांना वाटत असतं. इंग्रजी पुस्तकांवर किमती नसतात. त्या किमती वाढवून ते लोक विकतात. हल्ली पायरेटेड पुस्तकं दिली जातात आणि नंतर जर ती पुस्तकं तुमच्याकडं सापडली तर त्याचा होणारा त्रास मोठा असतो; पण तरीही अशी पुस्तकं घेतली जातात.

एक कुलकर्णी नावाचे गृहस्थ होते. त्यांनी त्यांच्या ग्रंथपालांना माझ्याकडं पाठवलं होतं. तर त्यांनी मला विनंती केली की, त्यांनी एका पुस्तक विक्रेत्याकडून बरीच पुस्तकं घेतली होती व त्यानं त्यासाठी लावलेल्या किमतीचं बिल ग्रंथपालातर्फे माझ्याकडं पाठवलं व ते बरोबर आहे का हे तपासायला सांगितलं. मी ते बिल चाळलं आणि मला असं दिसून आलं की किमती जास्त लावलेल्या आहेत. डिस्काउन्ट भरपूर दिला होता. ती पुस्तकं नक्कीच डुप्लिकेट असावीत अशीही मला शंका आली. कुलकर्णींना मी तसं सांगितलं. त्यांनी मला खूप रिक्वेस्ट केली, की तुम्ही कॉलेजमध्ये या आणि हे मला समजावून सांगा. मी

या कटकटीत कधी पडत नाही; पण त्यांचे चार-पाच वेळा फोन येऊन गेले. आणि एकदा मी नेमका सांगलीला जाणार होतो. त्यावेळीही त्यांचा फोन आला, तेव्हा जाता-जाता मी त्यांच्या कॉलेजवर गेलो आणि मी सगळं बघितलं. मी त्यांना दाखवलं आणि म्हटलं, 'काय आहे हे? तुम्ही जी लायब्ररी उभी केली आहे, यामध्ये पंचवीस-पंचवीस डिक्शनऱ्या घेतल्यात तुम्ही, एवढ्या डिक्शनऱ्यांची काही गरज नव्हती. या सगळ्यांच्या किमती किती वाढवून लावल्या आहेत हे बघा.' त्यानंतर कितीतरी पुस्तकं अशी घेतली होती की ती आउटडेटेड झाली होती. मी म्हटलं, की हे चुकीचं आहे. मी त्यांना बऱ्याच सूचना केल्या.

ब) लेखकाचे मानधन...

मराठी प्रकाशन व्यवसायातल्या एका गोष्टीबद्दल मला सर्वांत वाईट वाटतं व ते म्हणजे काही प्रकाशक लेखकाला मानधनाच्या बाबतीत खूप मोठ्या प्रमाणात फसवतात. लेखक आपल्या रक्तानं लेखन करत असतो. त्याला फसवता कामा नये. टायपिंग करणाऱ्याला पैसे मिळतात. संपादन, मुद्रितशोधन, मुखपृष्ठ करणाऱ्याला, छपाई करणाऱ्याला, पुस्तकनिर्मितीत जे जे असतात, त्या त्या सर्वांना त्यांचा मोबदला दिला जातो; पण लेखकालाच त्याचा मोबदला देण्याची प्रकाशकाची का इच्छा नसते, हे मला आतापर्यंत कळलेलं नाही. तुम्ही जे मानधन ठरवाल त्याविषयी आधीच काय ती घासाघीस करा. जमत नसेल तर ते पुस्तक प्रकाशित करू नका अन् प्रकाशित केलं तर हवं तर मुदत वाढवून, महिनाभर उशीर होणार असेल तर तसं सांगा; पण दिलेल्या वेळेत त्या लेखकाला मानधन मिळायला हवे. लेखक हे पैशासाठी लिहीत नसतात, आनंदासाठीच लिहितात; पण त्यातून जर त्याला थोडंफार मिळत असेल, त्याची अपेक्षा असेल तर ती चुकीची नाही. याबाबतीत प्रकाशकानं प्रामाणिक, चोखच असायला हवं; कारण माझा तरी अनुभव असा आहे की लेखक ही अतिशय समजूतदार व्यक्ती असते. त्रास देणारे लेखक फारच कमी असतात. तेव्हा एखाद्या लेखकाचं पुस्तक खूप प्रसिद्ध झालं की त्या प्रकाशकाला त्या लेखकाचे पैसे काढून घेण्याची जी हाव सुटते ती खूप चुकीची आहे. माझ्या मनाला पटतच नाही.

शरद गोगटे यांनी याच विषयावर, म्हणजे प्रकाशक तुम्हाला कसे वागवतात?

मानधन देतात की नाही? यावर बऱ्याच लेखकांची माहिती घेतली होती. तर त्यावरची बहुतांश लेखकांची उत्तरं ही नकारात्मकच होती. ती उत्तरं होती, 'प्रकाशक आम्हाला फसवतात', 'पैसे मिळतच नाहीत' किंवा 'वेळेवर मानधन दिले जात नाही', 'ते मागं लागून वसूल करून घ्यावे लागतात.'

माझ्याच अनुभवातला एक किस्सा सांगतो. पारेख नावाचे एक गृहस्थ कॅनडामध्ये आहेत. ते रसायनशास्त्राची पुस्तकं लिहितात. पूर्वी ते एस. पी. कॉलेजमध्ये शिकवत. तेव्हा एक चांगल्या मोठ्या प्रकाशकाने त्यांना विनंती केली, की 'अभ्यासक्रम बदललेला आहे, तर नव्या अभ्यासक्रमानुसार रसायनशास्त्राचे पुस्तक लिहा.' त्यांनी लिहिले. ते प्रकाशित झाले. त्याच्या दोन-तीन आवृत्त्या लगेचच गेल्या; कारण ते पुस्तक अभ्यासक्रमाचेच होते. शिवाय भारतीय लेखकांनी लिहिलेली पुस्तकं त्यावेळी कमी होती. पुढं त्यांना कॅनडात नोकरी लागली. ते तिथं गेले, तिथंही त्यांनी एक पुस्तक लिहिलं. ते अमेरिकेतल्या एका प्रकाशकानं प्रकाशित केलं. त्याची रॉयल्टी त्यांना अगदी वेळेवर व्यवस्थित मिळे. तिथं लेखकांची फसवणूक हा प्रकार नसतो. पुढं ते पुस्तक भारतातही बऱ्याच विद्यापीठांना लागलं.

सुदैवानं ते मूळचे कोल्हापूरचे होते व माझ्या नातेवाइकांच्या ओळखीचे होते. त्यामुळं नातेवाइकांच्या एका कार्यक्रमात माझी व त्यांची योगायोगानं भेट झाली.

मी त्यांना म्हणालो, 'तुमच्या पुस्तकाला भारतात बऱ्यापैकी मागणी आहे. तुमच्या मूळ अमेरिकन प्रकाशकाकडून पुस्तक मिळत नाहीये. आउट ऑफ प्रिंट आहे, तर आम्हाला ते प्रकाशित करण्यास द्याल का?'

त्यावर ते म्हणाले, 'हरकत नाही, मी देईन; पण त्यासाठी मला योग्य ते मानधन द्यावे लागेल.'

त्यावर मी त्यांना म्हणालो, 'ते मिळेलच. काळजी करू नका.'

मग मला त्यांनी त्यांचं पुस्तक प्रकाशित करण्यास दिलं. त्यानंतर आमचा चांगला परिचयही झाला.

एकदा निवांत गप्पा मारत असताना मी त्यांना विचारलं की, 'हे तुमचं पहिलं पुस्तक का?' तर त्यांनी एस. पी. कॉलेजात असताना लिहिलेल्या पुस्तकाविषयी सांगितलं. मी त्यांना उत्सुकतेनं विचारलं, की 'त्या प्रकाशकाचा अनुभव कसा होता?' ते मोठे प्रकाशक असल्यामुळं मला चांगलं काही

ऐकायला मिळेल अशी माझी अपेक्षा होती. तर त्यांनी सांगितलं की, 'मी कॅनडात गेल्यावर ते पुस्तक छापणं बंद केलं असं त्यांनी मला कळवलं; पण एक दिवस भारतात आल्यावर बेंगलोरला मी त्याची पाचवी, सहावी आवृत्ती पाहिली. मी शॉक झालो. खरं म्हणजे त्या पुस्तकाचं मानधन मी स्वतःसाठीही मागितलं नव्हतं. त्यांना मी विनंती केली होती, की ते मानधन मला न पाठवता परस्पर एका शाळेला मदत म्हणून पाठवा; पण माझी अशी फसवणूक ते करताहेत बघितल्यावर मी चिडलो व त्यांना खरमरीत पत्र लिहिलं, की तुम्ही हे जे काही करताय ते चुकीचं आहे. तेव्हा ते पत्र मिळाल्यावर तो प्रकाशक माझ्याकडं आला व त्यानं क्षमा मागितली. उरलेले मानधन दिले.'

अशा प्रकारचे बरेचसे प्रकाशक आपल्या मराठी प्रकाशन क्षेत्रात आहेत. आमच्याकडं बरीच पुस्तकं इतर प्रकाशकांची आली त्याचंही कारण हेच. उदाहरण द्यायचं तर व. पु. काळे यांची मुलं आम्हाला सांगत होती, की प्रत्येक प्रकाशकाकडून रॉयल्टी वेळेवर मिळेलच असं नसतं म्हणून आम्ही ही सर्व पुस्तकं तुमच्याकडं दिली. शंकर पाटलांच्या बाबतीतही असं होतं, की त्यांना रॉयल्टी मिळत होती; पण एकदा प्रकाशकानं सांगितलं, की तुमची पुस्तकं खपत नाहीत म्हणून ती प्रकाशित करायची बंद केली आणि ज्या वेळी मी त्यांची पुस्तकं प्रकाशित केली त्या वेळी पहिल्याच वर्षी त्याच्या भरपूर आवृत्त्या खपल्या. अशाच गोष्टी द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकरांबाबतीतही घडल्या आहेत. त्यांची पुस्तकं आजही आम्ही प्रकाशित करत आहोत. रणजित देसाई, वि. स. खांडेकर असे मोठमोठे लेखक त्यांच्या त्या त्या प्रकाशनाकडं राहू शकले नाहीत, याचं कारण त्यांना मिळालेल्या वागणुकीमुळं. याचं मला फार वाईट वाटतं.

आम्ही एक डिक्शनरी काढली होती. नंतर त्या लेखकानं ती दुसऱ्या प्रकाशकाला दिली; पण पुन्हा त्यांनी ती माझ्याकडं दिली; कारण आमचा व्यवहार अतिशय व्यवस्थित असतो हे त्यांना इतर प्रकाशकांचा अनुभव घेतल्यानंतर समजलं. असे अनेक पुस्तकांच्या बाबतीत घडले आहे. अनेक पुस्तकं माझ्याकडून गेली व ती पुन्हा माझ्याकडंच आली. त्यामुळं आतापर्यंत आम्ही मराठी प्रकाशन क्षेत्रात सर्वाधिक पुस्तकं प्रकाशित केली आहेत. सहा हजारच्या वर आमची पुस्तकं आहेत. त्यापैकी १८०० इन प्रिंट आहेत. अजूनही जुनी पुस्तकं आमच्याकडं पुन्हा पुन्हा छापली जातात. त्याला चांगली

मागणी आहे. दिवंगत झालेल्या लेखकांच्या वारसदारांसोबत आमचा करार केल्यानंतरच आम्ही ती प्रकाशित करतो. आणि या पद्धतीनं व्यवहार करण्यात जो आनंद असतो, तो मला वाटतं वेगळाच असतो. त्यात मला समाधान आहे.

लेखकाला रॉयल्टी देण्याबाबत आमची खरोखरच ख्याती आहे. याचं कारण जे मोठमोठे लेखक आहेत, उदा. सुधा मूर्ती, अरुण शौरी, किरण बेदी, तस्लिमा नासरिन या अशा अनेक लेखकांनी रॉयल्टी आम्ही अत्यंत वेळेवर देतो हे नेहमीच सांगितलं आहे. सुधा मूर्ती यांनी तर जाहीर सभेत सांगितलं आहे, की इंग्रजी प्रकाशकांच्या खालोखाल मला सर्वांत जास्त रॉयल्टी मिळत असेल तर ती मेहतांकडून व तीही वेळेवर.

क) आज कोणत्या प्रकारच्या साहित्याला मागणी अधिक आहे?

आजकाल चांगल्या अनुवादित कादंबऱ्यांना बऱ्यापैकी मागणी आहे. त्याचबरोबर व्यक्तिमत्त्व विकासावरील पुस्तकांना मागणी आहे. तसेच, हल्ली मला एकंदरीत असं दिसून येतं की, मुलं ग्रॅज्युएशन करताकरताच एम. पी. एस. सी., यू. पी. एस. सी. करण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळं तशा पुस्तकांना खूप मागणी आहे.

त्याचप्रमाणं आत्मचरित्रांनाही बऱ्यापैकी मागणी आहे. तसेच मराठीतली जी सुरुवातीपासूनच गाजलेली व चांगली पुस्तकं आहेत त्यांना अजूनही चांगली मागणी आहे. रणजित देसाई, व. पु. काळे, शिवाजी सावंत किंवा आपले पु. ल. देशपांडे, त्यानंतर मिलिंद बोकील, सुधा मूर्ती यांची पुस्तकं प्रचंड प्रमाणात खपतात.

इतर भाषेतील साहित्याला हल्ली बऱ्यापैकी दिवस आले असं मला वाटतं; याचं कारण असं की, मराठीमध्ये लिहिणारे कमी झालेत. ते अनुभव मांडण्यामध्ये किंवा घेण्यामध्ये ते तोकडे पडतात. त्यामुळं लेखकांची संख्या ही कमी होत चाललीय; पण नवोदित तरुण वर्ग आहे त्यांच्या अनुभवांमधली अस्सलताही भिडणारी आहे. ग्रामीण भागातून आलेले आणि ग्रामीण भाषेत लिहितात त्यांची पुस्तकंही वाचली जातात.

◆

प्रकाशक अनिल मेहता यांना ग्रंथोत्तेजक पुरस्कार प्रदान

'डिजिटायझेशन आणि ऑनलाइनच्या युगात छापील पुस्तकांची विक्री कमी झाली असे म्हटले जात आहे; मात्र मला ते मान्य नाही. पुस्तकांच्या विक्रीला ओहोटी लागलेली नाही.' – अनिल मेहता

दिलीपराज प्रकाशनाच्या ५१व्या वर्धापन दिनानिमित्त मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक, मेहता बुक सेलर्सचे प्रमुख, तसेच ज्येष्ठ ग्रंथ वितरक अनिल मेहता यांना 'दिलीपराज सुवर्णस्मृती ग्रंथोत्तेजक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी खासदार श्रीनिवास पाटील, भारतीय जनता पक्षाचे नेते श्याम जाजू, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, दिलीपराज प्रकाशनाचे संचालक राजीव बर्वे, मधुर बर्वे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या पुरस्कारासाठी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे श्री. अनिल मेहता यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

सुप्रसिद्ध बालसाहित्यिक राजीव तांबे यांना 'गुरुवर्य आबासाहेब अत्रे पुरस्कार'

गेली अनेक वर्षे सातत्याने लहान मुलांसाठी लेखन करणारे सुप्रसिद्ध बालसाहित्यिक राजीव तांबे यांना मानाचा 'गुरुवर्य आबासाहेब अत्रे पुरस्कार' दिला गेला आहे. दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी, पुणे आयोजित डॉ. प्रभा अत्रे पुरस्कृत, त्यांच्या पूज्य मातोश्री आणि वडिलांच्या

स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार प्रदान केला जातो. यंदा लेखक राजीव तांबे या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. हा पुरस्कार वितरण समारंभ बुधवार दि. ३० नोव्हेंबर रोजी दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी येथे पार पडला. डॉ. प्रभा अत्रे यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार राजीव तांबे यांना प्रदान करण्यात आला.

लहान मुलांना आनंददायी शिक्षण मिळावे व त्यांच्या कल्पनाशक्तीला, सर्जनशीलतेला वाव मिळावा यासाठी राजीव तांबे यांनी अनेक वर्षांपूर्वी 'गंमत शाळा' ही संकल्पना साकारली; तसेच या शाळेअंतर्गत शिक्षक, पालक यांच्या कार्यशाळा घेऊन अनेक कार्यक्रम देखील केले. त्यांच्या लेखातून, गोष्टींमधून, दूरचित्रवाणीमधील कार्यक्रमांमधून लहान मुलांना, त्यांच्या भावविश्वाला समजून घेण्याची धडपड नेहमीच दिसून येते. साध्या-सोप्या शैलीमुळे व अद्‌भुत, कल्पनारम्य गोष्टींमुळे त्यांचे लिखाण बालवाचकांत विशेष आवडीचे ठरले आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या बालसाहित्य विभागात मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षणतज्ज्ञ आणि लेखक राजीव तांबे यांचे या पुरस्कारासाठी मनापासून अभिनंदन.

डॉ. शुचिता फडके यांना कै. प्रा. आनंद वैद्य स्मृती पुरस्कार प्रदान

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेच्या १२८व्या वर्धापनदिनानिमित्त वार्षिक ग्रंथ पारितोषिक सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्यात मेहता पब्लिशिंग हाऊसच्या अनुवादक डॉ. शुचिता नांदापूरकर – फडके यांना यंदाचा 'कै. प्रा. आनंद वैद्य स्मृती पुरस्कार' भाषांतर क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी प्रदान करण्यात आला. सामाजिक अथवा साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. दि. २४ नोव्हेंबर रोजी वेदशास्त्रोत्तेजक सभा येथे महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनचे चीफ मेंटॉर विवेक सावंत यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

उत्तमोत्तम अनुवादांनी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथसंपदेत भर घालणाऱ्या डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके यांचे या पुरस्कारासाठी मन:पूर्वक अभिनंदन!

डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर लिखित 'करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब' पुस्तकाचे प्रकाशन

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शिस्तबद्ध संस्कारात वाढलेल्या छत्रपती इंदुमती राणीसाहेब म्हणजे इतिहासाच्या पानांवरील एक दुर्लक्षित व्यक्तिमत्त्व. अशा इंदुमती राणीसाहेबांचा जीवनप्रवास डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर लिखित आणि मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित **'करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब'** पुस्तकातून वाचकांच्या भेटीस येत आहे. या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच सासवड येथे छत्रपती युवराज्ञी संयोगिताराजे आणि श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या उपस्थितीत पार पडले. ३० नोव्हेंबर रोजी इंदुमती राणीसाहेब यांच्या स्मृतिदिनी हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. करवीरच्या इतिहासाची पार्श्वभूमी मांडत डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर यांनी या पुस्तकात इंदुमती राणीसाहेबांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला आहे. छत्रपती प्रिन्स शिवाजी यांच्या मृत्यूनंतर आपल्या सुनेला, अर्थात इंदुमती राणीसाहेबांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करणारे राजर्षी शाहू महाराज यांच्या अनोख्या ऋणानुबंधाचे पदर या पुस्तकातून उलगडत जातात.

◆



मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले पहिले पुस्तक

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोत्तापल्ले यांचे ३० नोव्हेंबर रोजी निधन झाले.

मेहता पब्लिशिंग हाऊसने ३८ वर्षांपूर्वी त्यांचे 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध' हे पहिले पुस्तक प्रकाशित केले होते.

त्याचबरोबर 'कावळे आणि माणसं', 'उद्याच्या सुंदर दिवसासाठी', 'राजधानी', 'शेतकऱ्याचा असूड' आदी पुस्तकेही प्रकाशित केली होती.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

◆



राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिनाच्या निमित्ताने...

३ डिसेंबर, १९८४ हा दिवस भोपाळच्या इतिहासात अतिशय दुर्दैवी ठरला. युनियन कार्बाईड (इंडिया) लिमिटेड या कंपनीच्या ६१०नंबरच्या जमिनीखालील टँकमधून अत्यंत विषारी अशा पेस्टिसाइड मिथाईल आयसोसायनाईट वायूच्या ४० टन गळतीमुळे जवळपास वीस हजार लोकांचा या दुर्घटनेशी निगडित आजारांमुळे मृत्यू ओढवला तर पाच लाखांहून अधिक जण जखमी आणि अपंग झाले होते. या दुर्घटनेत होरपळलेल्या, मृत्युमुखी पडलेल्या शेकडो निष्पाप जीवांच्या आठवणी कायम राहाव्यात या हेतूने संपूर्ण भारतात २ डिसेंबर हा दिवस 'राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन' म्हणून पाळला जातो. आत्तापर्यंतच्या इतिहासात सगळ्यात भयंकर आणि दुर्दैवी अशा मानवनिर्मित आपत्तींपैकी एक म्हणून भोपाळ वायुदुर्घटनेकडे पाहिले जाते. या घटनेमुळे पर्यावरण तसेच वातावरणात वाढणाऱ्या प्रदूषणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची, तसेच विचार करण्याची गरज निर्माण झाली.

या घटनेपासून २ डिसेंबर हा दिवस प्रदूषणाबाबतीत असलेले सगळेच महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करतो; तसेच मानवी स्वास्थ्य आणि पर्यावरणाबद्दलही काळजी व सहृदयता व्यक्त करतो. बदलत्या काळानुसार पुढे जाणारं जग, औद्योगिक क्रांती आणि विकास यांना पर्याय नसला तरी भविष्यात वाढणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन धोरणांचा अवलंब करणं आवश्यक आहे; जेणेकरून भोपाळसारख्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही. शिवाय लोकांमध्ये प्रदूषणामुळे होणाऱ्या दुर्घटनांमधून स्वत:चा बचाव आणि त्याविषयीची जागरूकता निर्माण होईल

असा प्रयत्न असतो. केवळ भारतच नाही तर संपूर्ण जगासाठी प्रदूषण हा खूप मोठा चिंतेचा विषय बनला आहे, जो वेगवगेळ्या प्रदूषणांना बळी पडला आहे. जसे की, वायू प्रदूषण, जल प्रदूषण, माती प्रदूषण, ध्वनी प्रदूषण इत्यादी. याशिवाय जे लोक औद्योगिक क्षेत्रात काम करतात त्यांना तर जवळपास दररोज सगळ्याच प्रकारच्या दूषित आणि विषारी वायूंशी सामना करावा लागतो. अशा प्रकारचे प्रदूषणयुक्त जीवन नव्या आजारांसोबत शरीराचे गंभीर स्वरूपात नुकसान करून आपली जीवनशैली बिघडवण्यास कारणीभूत ठरते.

या दिवसाच्या निमित्ताने सरकारी संस्थांद्वारे मोठ्या स्वरूपात प्रदूषण, जीवन, तसेच आरोग्य या विषयी जागरूकता पसरवण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. तसेच आपत्तीग्रस्त भागात राहणाऱ्या लोकांमध्ये प्रबोधन करून सुरक्षेविषयी माहिती देणे गरजेचे आहे. जगभरात प्रदूषणामुळे होणाऱ्या विविध दुर्घटना, ओढवले जाणारे महाभयंकर आजार, त्यामुळे होणारी जीवितहानी, वित्तहानी या सगळ्या बाबींचा विचार करता राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिनाचे औचित्य साधून सर्वत्र जागरूकता निर्माण करण्याचे हे राष्ट्रीय धोरण अतिशय स्वागतार्ह आहे. याच दिवसाची आठवण म्हणून या महिन्याच्या मेहता मराठी ग्रंथ जगत मासिकाच्या मुखपृष्ठावरही या दिवसाची आठवण आदरांजली स्वरूपात कायम ठेवली आहे. वाढते प्रदूषण आणि त्यासंबंधी असलेले अनेक मुद्दे या विषयाला जोडून येणारी अनेक पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित केली गेली आहेत. जशी की, ज्येष्ठ लेखक निरंजन घाटे लिखित 'वेध पर्यावरणाचा', 'पर्यावरण प्रदूषण' आणि 'वसुंधरा' तर किशोर पवार आणि नलिनी पवार लिखित 'वायू प्रदूषण' ही सर्व पुस्तके मिळवून जरूर वाचा. तसेच पर्यावरणाचा समतोल राखत प्रदूषणमुक्त जीवनशैली जगण्यासाठी आपण सारेच प्रयत्नशील राहू या.

मी लेखन कानडी भाषेतून केले, तरी माझे हृदय मराठी – सुधा मूर्ती

सुप्रसिद्ध लेखिका पद्मश्री सुधा मूर्ती म्हणतात, 'माझे लेखन कानडी भाषेतून झाले असले तरी माझे हृदय मात्र मराठीच आहे; कारण माझ्या बालपणीचा काही काळ कृष्णा-पंचगंगा संगमावरील कुरुंदवाडमध्ये गेला आहे.' मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे सांगलीत आयोजित केलेल्या 'संवाद लेखकाशी' या कार्यक्रमामध्ये पद्मश्री सुधा मूर्ती यांनी वाचकांशी संवाद साधला. या वेळी त्या म्हणाल्या की, 'माझं सुरुवातीचं शिक्षण मराठीतून झालं आहे, त्यामुळे आजही कुरुंदवाड व कोल्हापूरच्या आठवणी माझ्या मनात कायम आहेत.'

तब्बल १८ वर्षांनी सांगलीकर वाचकांशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याचा आनंद सुधा मूर्ती यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होता. दि. ७ नोव्हेंबर रोजी सांगलीच्या विष्णुदास भावे नाट्यगृहात हा कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी ज्येष्ठ अनुवादक लीना सोहोनी यांनी सुधा मूर्ती यांची मुलाखत घेतली. या कार्यक्रमाचा आनंद लुटण्यासाठी आणि सुधा मूर्तींना ऐकण्यासाठी सांगलीकर रसिक वाचकांनी नाट्यगृहात आणि नाट्यगृहाबाहेरही प्रचंड गर्दी केली होती. या कार्यक्रमात मेहता पब्लिशिंग हाऊसने आजवर प्रकाशित केलेल्या सुधा मूर्ती यांच्या सर्व २३ पुस्तकांचा एकत्रित संच वाचकांसाठी आणि विक्रीसाठी उपलब्ध केला होता. कार्यक्रमाच्या शेवटी संचावर आणि पुस्तकांवर स्वाक्षरी देण्याचा कार्यक्रमसुद्धा पार पडला.

◆

नवी संहिता... नवा आशय...

युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी



संपादक

डॉ. जयसिंगराव पवार

द. ग. गोडसे आणि डॉ. जयसिंगराव पवार
यांच्या पत्रव्यवहारातून घडणारं
इतिहासदर्शन

किंमत : १७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय



डॉ. जयसिंगराव पवार

समाजधुरीण शाहू महाराजांच्या
सामाजिकतेचं विविधांगी, अभ्यासपूर्ण दर्शन

किंमत : २००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

माझा आनंद

प्रसाद ओक

शब्दांकन

प्रज्ञा पोवळे

'धर्मवीर' साकारताना अभिनेते प्रसाद ओक यांना गवसलेला अद्‌भुत आनंद...

एखादा अभिनेता अविरत काम करत असतो. लोकप्रियताही लाभत असते; पण तरीही आव्हानात्मक अशी भूमिका साकारायची संधी त्याला मिळत नसते. त्यामुळे आतून तो अस्वस्थ असतो. प्रसाद ओक यांच्या बाबतीत काहीसं असंच झालं; पण त्यांची ही अस्वस्थता कमी केली ती 'धर्मवीर'ने. ध्यानीमनी नसताना

या चित्रपटातील मध्यवर्ती भूमिका...धर्मवीर आनंद दिघे साहेबांची...त्यांच्याकडे चालून आली. एक अभिनेता म्हणून त्यांच्यासाठी हा प्रचंड आनंदाचा क्षण होता आणि आव्हानाचाही. कसं पेललं त्यांनी हे आव्हान, काय काय करावं लागलं त्यांना या भूमिकेसाठी, त्यांच्याबरोबरच या चित्रपटाशी संबंधित सगळ्यांचा कसा कस लागला इ. बाबी त्यांनी 'माझा आनंद' या पुस्तकातून सविस्तरपणे उलगडल्या आहेत.

'धर्मवीर'साठी झालेली लुक टेस्ट ते 'धर्मवीर'चं प्रदर्शन या प्रवासातील हे अनुभवकथन आहे. दिवसभर 'धर्मवीर'चं शूटिंग आणि रात्रभर एका स्टुडिओत 'चंद्रमुखी'च्या संदर्भातील तांत्रिक काम...अशा चक्रात प्रसाद यांना सलग चार दिवस झोप घेता आली नाही इ. गोष्टी त्यांची अपार मेहनत दर्शवतात. आनंद दिघे या व्यक्तिमत्त्वाने त्यांना कसं व्यापून टकालं होतं, याचं प्रत्यंतरही काही प्रसंगांतून येतं.

त्यांना आनंद दिघे साहेबांच्या गेटअपमध्ये बघितल्यावर त्यांच्या निकटवर्तीयांच्या प्रतिक्रिया, शूटिंगच्या दरम्यानचे काही प्रसंग, विशेषत:, दिघेसाहेबांच्या मृत्यूचा प्रसंग, प्रसाद यांची पत्नी मंजिरी ओक यांनी शूटिंगच्या त्या गडबडीत, ते डाएटवर असतानाही त्यांचा साजरा केलेला वाढदिवस, प्रवीण तरडे आणि मंगेश देसाई, तसेच अन्य मित्रांचंही त्यांच्याबद्दलचं उत्कट प्रेम इ. बाबी मनाला स्पर्शून जातात.

एका चित्रपटासाठी किती जण राबत असतात, त्याचं प्रत्यंतर हे पुस्तक वाचताना येतं. हे पुस्तक म्हटलं तर एका अभिनेत्याच्या कारकिर्दीतील 'टर्निंग पॉइन्ट'ची यशस्वी गाथा आहे, म्हटलं तर एका चित्रपटाची निर्मितिप्रक्रिया आहे.

पुस्तकाच्या शेवटी मान्यवरांनी दिलेल्या प्रतिक्रियाही अभ्यासपूर्ण आहेत. एखाद्या चित्रपटाच्या निर्मितिप्रक्रियेवर लिहिलेलं किंवा एखाद्या अभिनेत्याने त्याच्या भूमिकेविषयी लिहिलेलं मराठीतील हे कदाचित पहिलं पुस्तक असू शकतं. अभिनयाच्या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या किंवा या क्षेत्रात नव्याने आलेल्या तरुणांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल, यात शंका नाही.

प्रसादजींचं त्यांच्या साहित्य क्षेत्रातील पदार्पणाबद्दल आणि 'धर्मवीर'च्या यशाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

◆



अ-अमिताभचा

जी. बी. देशमुख

महानायक अमिताभ बच्चनच्या सुवर्णमहोत्सवी कारकिर्दीतील बासष्ट भूमिकांचे खुमासदार चर्वण

१९६९ मध्ये अमिताभ बच्चन यांचे रुपेरी पडद्यावर आगमन झाले. या लार्जर दॅन लाइफ कारकिर्दीचा सुवर्ण महोत्सव २०१९-२० मध्ये झाला. त्या निमित्ताने जी. बी. देशमुख यांनी दै. 'सकाळ'च्या रविवारीय

'सप्तरंग' पुरवणीत 'अ-अमिताभचा' हे सदर लिहिले. यातून पन्नास वर्षांत अमितजींनी वठवलेल्या उल्लेखनीय भूमिकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. सव्वा वर्षाच्या काळात 'अ-अमिताभचा' या सदरात अमिताभजींच्या एकूण बासष्ठ भूमिकांची चर्चा त्यांनी केली. 'ये पुलिस स्टेशन है। तुम्हारे बाप का घर नही।' पासून सुरू झालेला त्यांच्या गाजलेल्या संवादांचा सिलसिला 'झुंड नहीं, टीम कहिये' पर्यंत सातत्याने सुरू आहे. त्यांनी म्हटलेले डायलॉग बोली भाषेचा भाग होताना आपण पाहिले. किशोर कुमार, रफी यांच्या गाण्यांचे पडद्यावर चीज होताना आपण पाहिले. अमिताभ बच्चन यांच्या कारकिर्दीशी सिनेमा रसिक समरस होत गेले. त्या सगळ्या सिनेमांना, गाण्यांना, संवादांना आणि अमिताभ यांच्या अभिनयाला उजाळा देणारे पुस्तक- 'अ-अमिताभचा'.

◆

नवी संहिता... नवा आशय...

कुलामामाच्या देशात

जी. बी. देशमुख



मेळघाटच्या जंगलात रानवाटा तुडवत कुलामामाचं अर्थात वाघोबाचं दर्शन घेण्यासाठी करावी लागणारी जद्दोजहद्द, खुसखुशीत प्रसंग आणि पेचप्रसंग यांचं खुमासदार शैलीतील मनोरंजक कथन

किंमत : २००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध



मोहनस्वामी

वसुधेंद्र

अनुवाद

डॉ. डी. व्ही अरवंदेकर

जगाच्या अव्हेरलेपणानं आयुष्यभर भळभळणाऱ्या जखमा वाहणाऱ्या समलिंगी जोडप्यांच्या अंतर्मुख करणाऱ्या कथा...

'गे' जीवनाच्या अंधकारमय कोशातून बाहेर पडण्याचा हा अखेरचा मार्ग असल्याचे सूचित करण्याचा प्रयत्न लेखकांनी या पुस्तकामधून केला आहे. दोन पुरुषांमधील कामजीवनाचे वर्णन करणाऱ्या या कथा,

परंपरागत रूढीमध्ये बंदिस्त असलेल्या समाजातील वाचकांच्या पचनी पडण्यासारख्या नाहीत. त्यामुळे ते चक्रावून जाण्याची शक्यता आहे. या पुस्तकातील मोहनस्वामीच्या कथांमध्ये लैंगिक जीवन, नागरीकरण आणि जातीपातींमधील संघर्ष यांचे रोखठोक आणि काहीशा स्पष्ट शब्दांत केलेले वर्णन वाचकांना अचंबित करण्याची शक्यता आहे. इंग्लिश, तेलुगू, मल्याळम् आणि स्पॅनिश भाषांमधून अनुवादित झालेल्या या पुस्तकाची मराठी आवृत्ती वाचकांसमोर ठेवून कन्नड साहित्याच्या एका महत्त्वाच्या पैलूचा परिचय करून देण्याचा आमचा मनोदय आहे.

कार्तिक नावाच्या आपल्या दीर्घकालीन मित्राला मोहनस्वामी पारखा झाला आहे. एका सुंदर मुलीने कार्तिकला त्याच्यापासून हिरावून घेतले आहे. सर्व जुन्या आठवणी चितेप्रमाणे त्याला जाळत आहेत. तसे पाहिले, तर त्याची अपेक्षा काही फार मोठी नाही. एक साधे, सरळ मानाचे जीवन जगण्यासाठी तो धडपडत आहे. पुरुष गणिका, वाघीण अशी घाणेरडी नावे देऊन समाजाने त्याच्या मनावर जखमा केल्या आहेत. गतजीवनातील मनाला झालेल्या जखमा, अपमान, भीती, आतंक आणि वैफल्य हे सर्व विसरून नवीन जीवनाची वाटचाल सुरू करण्याची त्याची इच्छा आहे. त्यासाठीच आटापिटा सुरू आहे.

◆

नवी संहिता... नवा आशय...

बाईची गोष्ट

प्रा. पुरुषोत्तम रामदासी



कामवासनेची अनंत रूपं मांडणाऱ्या या शृंगारकथा, लैंगिकतेसंबंधीच्या मानसिक प्रदूषणावर प्रहार करणाऱ्या विलक्षण कथा

किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध



दि व्हॉल्ट ऑफ विष्णू

अश्विन सांघी

अनुवाद

संकेत लाड

मिथक कथा, इतिहास आणि समकालीन वास्तवाला समांतर कथात्म बांधणीत अलवार गुंफणाऱ्या अश्विन सांघी यांची भारत मालिकेतील दमदार कादंबरी...

भारत आणि चीन युद्ध पेटलेलं असतं आणि चिनी सैनिक भारतीय सैनिकांवर चाकूहल्ला करून त्यांना अक्षरश: फाडून काढतात. चिनी सैनिकांचा हा हल्ला आणि एकूणच त्यांच्या हालचाली पाहून भारतीय लष्करप्रमुख आणि अन्य काही जणांना त्यात काहीतरी 'वेगळं' असल्याचा संशय येतो. ते 'वेगळं' काय आहे, याचा शोध घेण्यासाठी सीओएससी ('चीफ्स ऑफ स्टाफ कमिटी')कडून परमजित (पॅम) खुरानाची नेमणूक केली जाते. सीओएससीचे विशेष सल्लागार असतात जय ठाकूर. भारतीय लष्करप्रमुखांनी त्यांना पॅमचं नाव सुचवलेलं असतं. पॅम ही भारत सरकारच्या डीआरडीओ (डिफेन्स रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेन्ट ऑर्गनायझेशन) या संस्थेमध्ये कार्यरत असते. आता या विशिष्ट कामासाठी तिला सीबीआयमध्ये (केंद्रीय अन्वेषण खाते) प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्त केलं जातं. शांतिसेनेचे नायक किशन खुराना यांची ती मुलगी असते. किशन खुराना यांचा पॅम लहान असतानाच गूढ रीतीने मृत्यू झालेला असतो. तर चिनी सैनिकांमधील 'वेगळेपण' शोधण्याच्या मोहिमेत पॅम, मार्कचं सहकार्य घेते. मार्क हा 'सीबीटीटी' (सेंटर फॉर बायोइंजिनिअरिंग, ट्रेनिंग ॲन्ड टेरेन') या कंपनीचा प्रमुख असतो. मार्कची आणि तिची यापूर्वीच ओळख असते आणि तेव्हा ते जवळही आलेले असतात; पण मध्यंतरीच्या काळात त्यांचा एकमेकांशी संपर्क आलेला नसतो. आता या मोहिमेच्या निमित्ताने ते परत जवळ येतात. रिसर्च ॲन्ड ॲनॅलिसिस विंग (रॉ) या परराष्ट्रविषयक गुप्तचर संस्थेचे प्रमुख व्हीटीके आणि याच संस्थेत काम करणाऱ्या जया (ज्या बहुभाषाकोविद असतात) हे दोघंही पॅमला मदत करणार असतात.

दरम्यान, मार्क, पॅमबरोबर भारत-चीन युद्धातील त्या विशिष्ट दृश्याची चित्रफीत पाहतो आणि त्याच्या तंत्रज्ञालाही बघायला सांगतो. चित्रफितीतील चिनी सैनिक रोबोटसदृश असल्याचा दावा मार्कचा तंत्रज्ञ करतो. याव्यतिरिक्त मार्ककडून तिला बरीच माहिती मिळते. ज्यात एर्किन चाँग या शास्त्रज्ञाचा समावेश असतो, जो कृत्रिम बुद्धिमत्तेने सज्ज असणाऱ्या रोबोटच्या तंत्रज्ञानात कुशल असतो. स्टॅनफर्डमध्ये काम करणाऱ्या एरिकला बीजिंगला आणण्यात चीनने यश मिळवलेलं असतं. तसंच, डॉ. राजा राव यांच्याबद्दलही तिला मार्ककडून माहिती मिळते, जे नव्वद वर्षांचे असतात आणि ह्यूमन इंजिनिअरिंगमधील सर्वांत ज्ञानी मनुष्य, अशी त्यांची ओळख असते; मात्र ते हयात आहेत की

नाही आणि असले तर कुठे आहेत, याविषयी मार्कला काहीच माहीत नसतं. तरी ती यातायात करून त्यांचा ठावठिकाणा शोधण्यात यशस्वी होते. यासाठी तिला देव नावाच्या माणसाची मदत होते. त्यांच्याबद्दल माहिती करून घेण्यासाठी तिला देवशी खोटं बोलावं लागतं. देवला मनात नसतानाही राव आणि त्यांची मुलगी अनू यांचं विधायक काम थांबवून, त्यांना अज्ञातवासात पाठवणं भाग पडलेलं असतं. पॅमला त्यांचा ठावठिकाणा सांगितल्याची जबर किंमत त्याला मोजावी लागते. त्याला ठार मारण्यात येतं.

राव, पॅमला एक हस्तलिखित वाचायला देतात आणि 'रासविनोद' नावाची साहित्यकृतीही वाचायला सांगतात. काय असतं त्या हस्तलिखितात आणि साहित्यकृतीत? पॅम, राव यांच्या घरी येऊन गेल्यावर राव आणि त्यांची मुलगी अनू यांचं अपहरण करण्यात येतं. हनुमानाच्या एका मंदिरातील मूर्तीखाली तीन प्राचीन कलश असतात. त्या कलशांसाठी राव आणि त्यांच्या मुलीचं अपहरण करण्यात आलेलं असतं. काय असतं त्या कलशांमध्ये? त्या कलशांमधील घटकांचा चिनी सैनिकांना (रोबोटसदृश) रोखण्यात उपयोग होणार असतो का? पॅमची ही शोधमोहीम यशस्वी होते का? एर्किन चाँग नक्की काय करत असतो? जय ठाकूर आणि त्यांची प्रेमिका यांची या प्रकरणात नक्की काय भूमिका असते? या कथानकाबरोबर समांतरपणे चाललेल्या एका बौद्ध भिक्खूच्या प्रवासाचा या कथानकाशी काय संबंध आहे?

◆

नवी संहिता... नवा आशय...

दादाजी कोंडदेव कोण होता?

डॉ. जयसिंगराव पवार

थोर पुरुषांचं कर्तृत्व आणि इतिहासातील सत्यासत्यतेचा अभ्यासपूर्ण धांडोळा



किंमत : १७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

।व्य।क्ति।वे।ध।

शरद पवार...
ते
...गोविंद पानसरे

डॉ. जयसिंगराव पवार



इतिहास संशोधन, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील प्रसिद्ध -अप्रिसिद्ध व्यक्तींच्या कार्याचा, व्यक्तिमत्त्वांचा अभ्यासपूर्ण वेध

किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध



चाणक्याचा मंत्र

अश्विन सांघी

अनुवाद

दीपक कुळकर्णी

मिथक कथा, इतिहास आणि समकालीन वास्तवाला समांतर कथात्म बांधणीत अलवार गुंफणाऱ्या अश्विन सांघी यांची भारत मालिकेतील दमदार कादंबरी...

'चाणक्याचा मंत्र.' चाणक्य कोण हे सर्व भारतीयांस चांगलेच ठाऊक आहे. इसवीसन पूर्व ३४०. परिस्थितीने होरपळलेला पण ध्येयाने झपाटलेला एक ब्राह्मण युवक आपल्या परमप्रिय पित्याच्या निर्घृण हत्येचा सूड घेण्याची प्रतिज्ञा करतो. थंड डोक्याचा, कावेबाज, कठोर व प्रचलित नीतिमूल्यांना न जुमानणारा तो युवक, भारतातील सर्वश्रेष्ठ रणनीतिकार बनतो. अलेक्झांडरच्या आक्रमणाविरुद्ध विस्कळीत झालेल्या भारताला एकसंघ बनवण्यात यशस्वी होतो. चंद्रगुप्ताला विशाल मौर्य साम्राज्याच्या सिंहासनावर विराजमान करतो.

आजच्या काळात म्हणजे अडीच सहस्राब्दीनंतर चाणक्य पुन्हा गंगासागर मिश्राच्या रूपात अवतार घेतो. भारतातील एका छोट्या शहरात, व्यवसायाने शिक्षक असणारा गंगासागर अनेक महत्त्वाकांक्षी व्यक्तींना आपल्या हातातील कठपुतळ्या बनवतो. आधुनिक भारत हा प्राचीन भारतासारखाच वर्णभेद, भ्रष्टाचार आणि समाज विभाजक राजकारण यांनी दुंभगलेला आहे. हा कावेबाज पंडित, भारताला पुन्हा एकदा एकत्र आणण्याचा चमत्कार करू शकेल का? याचे उत्तर मिळवण्यासाठी अश्विन सांघी या सर्वाधिक खपाची पुस्तके लिहिणाऱ्या लेखकाचे 'चाणक्याचा मंत्र' हे पुस्तक वाचलेच पाहिजे.

◆

अश्विन सांघी यांची आगामी पुस्तके

दि रोझाबल लाइन
द कृष्णा की
सियालकोट गाथा
कालचक्राचे रक्षक

TBC-31 Book No. 2

पुस्तक परिचय



टेलटेल

जेफ्री आर्चर

अनुवाद

लीना सोहोनी

जेफ्री आर्चरच्या खुसखुशीत शैलीतून साकारलेल्या ठगांच्या रंगतदार उत्कंठावर्धक कथा

जेफ्री आर्चर यांच्या आधीच्या कथासंग्रहानंतर तब्बल एका दशकाने ते '*टेल टेल*' या नवीन कथासंग्रहासह वाचकांच्या भेटीला आले आहेत. या कथांद्वारे लेखकाला भेटलेल्या लोकांच्या अंतर्मनाचं मोहक, रोमांचकारी आणि अचूक दर्शन लेखक आपल्याला घडवतो. गेल्या दहा वर्षांत त्याने विविध देशांना भेटी दिल्या. या प्रवासात नानाविध प्रकारची माणसं त्याला भेटली. ती माणसं आणि त्यांच्या जीवनकहाण्या या कथांमधून त्याने साकारल्या आहेत.

'मेअरला कुणी मारलं?' या कथेतला तरुण डिटेक्टिव्ह जेव्हा नेपल्ससारख्या मोठ्या शहरातून इटलीतल्या, डोंगराच्या कुशीत वसलेल्या एका नितांत रमणीय खेड्यात शोधकार्यासाठी येऊन पोहोचतो, तेव्हा तिथे काय घडतं, ते प्रत्यक्षच वाचा. तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेल्या मुलाचं संपूर्ण आयुष्य एका प्रसंगानंतर क्षणार्धात कसं बदलून जातं, ते 'दमास्कसच्या वाटेवर' या कथेत वाचा.

'सद्‌गृहस्थ आणि पंडिता' या कथेत १९३०च्या दशकात आय. व्ही. लीग युनिव्हर्सिटीमध्ये पुरुषांना आव्हान देण्यासाठी उभ्या ठाकलेल्या विदुषीची कहाणी वाचा आणि एक तरुण विद्यार्थिनी एका म्हाताऱ्याच्या कारमधून लिफ्ट घेऊन जेव्हा कॉलेजला परत जायला निघते, तेव्हा त्या तासाभराच्या प्रवासात तिला नेमकं भेटतं तरी कोण, हे जाणून घ्या 'वाया गेलेला तास' या गोष्टीतून.

जेफ्री आर्चर यांचा '*द टाइम्स*' या वृत्तपत्राने 'नव्या युगाचा सर्वोत्कृष्ट कथाकार' असा गौरव केला आहे. या सर्व विलक्षण रोमांचकारी आणि मनाला भावणाऱ्या कथा वाचल्यानंतर हे त्यांचं वर्णन किती सार्थ आहे, हे तुम्हा वाचकांनासुद्धा पटेल.

◆

TBC-31 Book No. 3

पुस्तक परिचय



द इलेव्हन्थ कमान्डमेन्ट

जेफ्री आर्चर

अनुवाद

मोहन गोखले

मास्टर स्टोरी टेलर जेफ्री आर्चर यांच्या अफाट कल्पनाशक्तीचा अचाट नमुना...

मेडल ऑफ ऑनर विजेता कॉनर फिट्सगेराल्डची ही अफलातून कथा. कुटुंबवत्सल, सच्चा फिट्सगेराल्ड अठ्ठावीस वर्षे दुहेरी आयुष्य जगतोय. एका निशाण्यात लक्ष साधणारा हा सीआयएचा अतिशय तरबेज गुप्त मारेकरी. निवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना या दुहेरी आयुष्याला निरोप देण्याची स्वप्नं पाहत आहे; पण तेव्हाच त्याची प्रमुख हेलन डेक्स्टर त्याची शत्रू ठरतेय. डेक्स्टरचं सीआयएतलं भविष्य धोक्यात आलं आहे आणि त्यातून निसटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे फिट्सगेराल्डचा काटा काढणं. फिट्सगेराल्डला रशियाच्या भावी राष्ट्राध्यक्षांच्या हत्येसाठी नेमलं जातं; पण त्याच मोहिमेत फिट्सगेराल्डचा स्वत:चाच काटा काढण्याची योजना आखली जाते. आणि एक उत्कंठावर्धक नाट्य रंगतं. पानागणिक उत्कंठा वाढवणारं कथानक, दमदार पात्ररचना असलेलं जेफ्री आर्चरचं राजकीय नाट्य.

◆

नवी संहिता... नवा आशय...



सोन्याचं कडं

वऱ्हाडगोष्टी

लेखक : ज्ञानदा नाईक

किंमत : ₹ १९५। कुमारसाहित्य

उमा होती शहाणी... तिने आजीला वाचायला शिकवलं इंग्रजी... कुत्रा आणि लांडगा होते बरोबर... पण कुत्याने इमानदारीच्या आश्वासनाने मागितलं घर... प्रसन्ना नवीन घरात राहायला गेली; पण का नक्कत आवडलं तिला ते घर?... एका कारखानदाराचा मुलगा हरवल्याच्या बातमीतील त्या मुलाचं वर्णन वाचून जनकला वाटलं आपणच आहोत तो मुलगा... मग काय झालं पुढे?... पाण्यात स्वत:चं प्रतिबिंब पाहून खूश झालेलं झुडूप झाडाचं पाण्यातील प्रतिबिंब पाहून हिरमुसलं...कळी खुलली का परत झुडपाची?... शंभवीला सुचत नव्हतं आर्ट्सला जावं की कॉमर्सला की सायन्सला... कोणाचा सल्ला घेतला मग तिने?... एका अभ्यासू आणि ज्ञानी गृहस्थांना गावोगावी भ्रमंती करताना एका शेतात सापडलं एक सोन्याचं कडं... ते कडं त्या शेतातील शेतकऱ्याला ते गृहस्थ देत असतानाही, तो ते का स्वीकारत नाही?... उमा झाली होती जयूची फॅन... मग तिने काय केली कमाल?... शहरातला रोहन गेला गावात... तिथे त्याला कशी मिळाली मित्रांची साथ?... गोष्टी छोट्या छोट्या छान... गोष्टींच्या शेवटी संकल्प नीतिमान... चित्रं आहेत सुंदर, देखणी... कुमारांसाठी अनोखी पर्वणी



नाते ब्रह्मांडाचे

जो मर्चंट

अनुवाद

लीना दामले

अवकाशातील गूढ घटनांचा वेध घेत मानवी संस्कृतीशी नाते सांगणारे पुस्तक

मानवजातीच्या इतिहासामध्ये माणसाचे आणि ताऱ्यांचे कायमच एक घट्ट नाते राहिले आहे. कधीकाळी आपल्या धार्मिक श्रद्धांवर, सत्तेच्या संरचनांवर, वैज्ञानिक प्रगतीवर आणि अगदी आपल्या जीवशास्त्रावरसुद्धा ताऱ्यांचा कितीतरी प्रभाव होता; पण मागील काही

शतकांपासून आपल्या भोवतालच्या अवकाशापासून आपण स्वत:ला दूर ठेवले आहे आणि त्याची किंमत आपल्याला मोजावी लागते आहे, लागणार आहे.

हे पुस्तक म्हणजे एक इतिहासाची सफर आहे. इतिहास कशाचा? तर लासकॉक्स गुहेतील आदिमानवाने काढलेल्या बैलांच्या चित्रांपासून ते ताहितियन नावाडी ताऱ्यांचा दिशादर्शकासारखा उपयोग करून प्रवास करू लागले तिथ-पर्यंत. मध्ययुगीन साधू 'काळाच्या' प्रकृतीला आव्हान देऊ लागले तिथपासून ते अवकाश आणि वेळ एकच असल्याचा आइनस्टाइनला शोध लागला तिथपर्यंत सगळ्याचा सोप्या आणि रंजक भाषेत सांगितलेला हा इतिहास आहे. लेखक असे सुचवतो आहे की आपण ज्या अवकाशाचा भाग आहोत ते अवकाश, त्याचा आपल्या आरोग्यावर होणारा परिणाम, त्यातील संभाव्य प्रेरणा आणि आविष्कार यांचा आपण नव्याने शोध घेतला पाहिजे.

◆

नवी संहिता... नवा आशय...



राजा, कबुतर आणि वृद्ध

वज्रगोष्टी

लेखक : ज्ञानदा नाईक

किंमत : ₹ १९५। कुमारसाहित्य

नंदी होता दुःखी... त्याला मिळाली संधी... शैलेश, प्रणव आणि अनुजाने पाडला पाऊस खोटा...त्यामुळे त्यांचाच झाला तोटा... श्यामलीने बाग केली शिल्पाच्या हवाली... शिल्पाच्या दुर्लक्षामुळे बाग कोमेजली... चीनच्या राजाची कबुतरांची आवड बेतत होती कबुतरांच्या जिवावर... एका वृद्धाने काय केलं कबुतरांना वाचवण्यासाठी?... उंदरांच्या त्रासापासून वाचण्यासाठी शैलेश शेतकऱ्याने गोदामात बसवले स्पीकर... झाला का त्याचा हा उपाय सफल?... सूर्य-चंद्र आधी होते धरणीवर... मग का गेले ते आकाशात?... कोणाला काय व्हायचंय हे ठरवताना शंकरला व्हायचं होतं गरुड, रमेशला व्हायचं होतं पिंपळ, शिरूला व्हायचं होतं डोंगर, मंगलला व्हायचं होतं नदी... अनंतला मात्र माणूसच राहायचं होतं... का? फटाक्यांसाठी वांडिलांकडून पैसे घेऊन मुरलीधर गेला दुकानात... पण का नाही घेतले त्याने फटाके?... बुलबुलचा हुबेहूब आवाज काढणारा कलावंत झाला होता प्रसिद्ध...पण राजदरबारात त्याने कला सादर केल्यावर काय झाले?... दोन मित्रांपैकी एका मित्राला झाला होता अनेक वस्तू जमविल्याचा आनंद...दुसऱ्या मित्राची त्यावर काय होती प्रतिक्रिया?... गोष्टी छोट्या छोट्या छान... गोष्टींच्या शेवटी संकल्प नीतिमान... चित्रं आहेत सुंदर, देखणी... कुमारांसाठी अनोखी पर्वणी

मार्क ट्वेनच्या निवडक कथा

मार्क ट्वेन

अनुवाद

रोहिणी बागल

मार्क ट्वेनच्या कथा रंगतात फार...
सांगतात जीवनाचं सार

'लाखाची गोष्ट' या कथेतील कंगाल नायकासमोर आव्हान आहे लंडनसारख्या शहरात दहा लाख पौंडाच्या नोटेच्या आधारे एक महिना तग धरून राहण्याचं. तो यशस्वी होतो का?...

'ऑनलाइन शुभमंगल' कथेत अमेरिकेतील दूरदूरच्या दोन टोकांच्या शहरातील युवक-युवती एकमेकांना न पाहता टेलिफोनच्या माध्यमातून एकमेकांच्या प्रेमात पडतात; पण त्यांच्या प्रेमात कोणीतरी बिब्बा घालतं. काय होतं पुढे?...

'परतीची वाट' या कथेतील हेन्री आपल्या घरात आलेल्या अतिथीला आपल्या माहेरी गेलेल्या बायकोविषयी सांगत असतो. तिच्या येण्याची अतिथीही औत्सुक्याने वाट पाहत असतो. येते का ती?...

'एक डाव भुताचा' ही कथा पुतळ्याच्या भुताभोवती फिरते...

'मृत्यूची गोल चकती' ही कथा, आपल्या पित्याला फाशीच्या शिक्षेपासून वाचवणाऱ्या निरागस मुलीची आहे.

मार्क ट्वेनच्या रंगतदार शैलीतून साकारलेल्या आणि अंतर्मुख करणाऱ्या कथांचा संग्रह.

◆

नवी संहिता... नवा आशय...

रंगीत घोटाळा आणि छोटे जवान

लेखक : **राजीव तांबे**

किंमत : **₹ १४०। बालसाहित्य**

इवलीशी बब्बड... तिचं इटुकलं जग... तिचे आई-बाबा... बब्बडचं आई-बाबांबरोबर हॉटेलमध्ये जाणं... बाबांच्या मित्राच्या घरी जाणं... बब्बडचं बाबांबरोबर खिडकीतून पाऊस पाहणं... बाबांना हळवं झालेलं पाहणं... बाबांच्या ताटातला पदार्थ हळूचकन बब्बडच्या तोंडात जाणं... तर बब्बडच्या इटुकल्या दुनियेची रंगीबेरंगी सफर



मराठी दौलतीचे नारीशिल्प

गोपाळ देशमुख

कालचक्राच्या क्रूर छायेतून स्वातंत्र्याचे दीप प्रज्वलित करणाऱ्या तेजस्विनी

'मराठी दौलतीचे नारी शिल्प' ही राजमाता जिजाऊ, सईबाई, सोयराबाई, सकवारबाई, ताराबाई, उमाबाई दाभाडे, दर्याबाई निंबाळकर, गोपिकाबाई पेशवे, पार्वतीबाई, रमाबाई, गंगाबाई, जिजाबाई - (कोल्हापूरची गादी स्वतंत्रपणे जपणाऱ्या), भागिरथीबाई, अहिल्याबाई होळकर, माईसाहेब व राणी लक्ष्मीबाई या स्त्रीरत्नांनी केलेले मोलाचे कार्य इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले. राजे संभाजींच्या वधानंतर राणी येसूबाई दूरदृष्टीने जगली. शाहूला घेऊन उभी हयात त्यांनी कैदेत काढली; तरीही स्वराज्याचे अचूक निर्णय घेतले. त्याचा फायदा ताराबाईंना सातारा-कोल्हापूरची गादी चोख चालवण्यास झाला. इ.स.१७००ला क्षयबाधा होऊन छत्रपती राजाराम गेले. त्यावेळी ताराबाईंनी आपल्या दोन वर्षांच्या मुलास सांभाळून पराक्रम गाजवला. जिंजीच्या वेढ्यात कैदेत राहूनही पराक्रमाचा झेंडा फडकवला. ताराराणी वयाच्या ८०-८५व्या वर्षी १७६१ला मृत्यूला सामोऱ्या गेल्या. पेशवाई काळातही 'मराठी दौलती'ने झेंडे फडकवले, तरी स्वराज्यात असंख्य कलह, बारभाई कारस्थान, पानिपतचा संहार, महादजींचा मृत्यू, युद्धे अशी अनेक संकटे आली. त्याच्या साक्षीदार 'सुभेदाराची सून' म्हणून ख्याती असलेल्या अहिल्याबाई होळकर यांचे नाव आवर्जून घेतले जाते. त्यांनी रयतेला देवासमान मानले. त्यांचे समाजकार्य व दूरदृष्टी महान ठरते. 'भाऊ भाऊ' करत झालेला नानासाहेबांचा मृत्यू, नाना फडणवीसांचा कारभार, 'सांगोला करार' हे सातार घराण्याला जाचक ठरले. दुसऱ्या शाहूंचे इ.स.१८०८ला निधन झाले. धाकट्या शाहूंची चौथ्या राणीपासूनची प्रतापसिंह, रामचंद्र व शहाजी ही तीन मुले. या राणीसाहेब म्हणजेच आनंदीबाई, या 'माईसाहेब' नावानेच ओळखल्या जात. या माईसाहेबांना पेशव्यांनी व इंग्रजांनी केवळ आश्वासनेच दिली. शेवटी सातारचे राज्य खालसा झाले. ही शोकांतिका माईसाहेबांना पाहवली नाही. गंगाबाई ही नारायणराव पेशव्यांची पत्नी. सवाई माधवरावांना जन्म देऊन जेवढे भाग्य त्यांना मिळाले,त्यापेक्षा जास्त दुःखच गंगाबाईंच्या वाट्याला आले. राघोबांनी केलेला पतीचा वध व लहान मुलाचे दुःख सोबत घेऊनच त्यांचा मृत्यू झाला. सवाई माधवरावांचाही एकविसाव्या वर्षीच शनिवार वाड्यात मृत्यू झाला व त्यांची पत्नी रायगडावर कैदेत पडली. तिला पुन्हा शनिवार वाडा दिसला नाही. गोपिकाबाई शनिवार वाड्यावर वावरल्या; पण नंतर त्यांनी शनिवार वाड्याचा त्याग करून नाशिक पंचवटी गाठली. सदाशिवराव भाऊंची पत्नी ते हयात आहेत, हे समजूनच मरेपर्यंत

सौभाग्यलेणी घालून जीवन जगली. माधवराव पेशव्यांची पत्नी रमाबाई त्यांच्याबरोबरच 'थेऊर' येथे सती गेल्या. पेशव्यांच्या जप्तीच्या तडाख्यातून, दत्तक मंजुरीतून जिजाबाईने कोल्हापूरचे राज्य वाचवले. अनेक शतकांचे उपकार तिने मराठी मुलखावर केले.

राणोजी शिंदेंचे पुत्र दत्ताजी मातब्बर सरदार. त्यांची पत्नी भागिरथीबाई. श्रीगोंदे येथील लग्नानंतर तिच्या अंगावरील हळद निघते न निघते, तोच ती उत्तरेकडील स्वारीत सामील झाली. लढाईत 'बरारी घाटा'वर यमुनातीरी दत्ताजींचा वध झाला, 'बचेंगे तो और भी लडेंगे' हे त्यांचे प्रेरणादायी उद्‌गार सर्वांना चटका लावून गेले. गौतमीबाई ही मल्हारराव होळकरांची पत्नी, भागिरथीबाई दत्ताजींची व कासीबाई ही जनकोजी शिंद्यांची पत्नी. यांनी जीवघेण्या प्रसंगांतून फौजेला उज्जैन-माळव्यापर्यंत आणले. यावेळी पार्वतीबाई जीव वाचवून दक्षिणेत आल्या. म्हणूनच पानिपत युद्धात एक लाख बांगडी फुटली अशी नोंद आढळते. 'झाशी'ची राणी लक्ष्मीबाईंचा पराक्रम तर गगनाला गवसणी घालणारा ठरला. 'मेरी झांसी नही दूँगी...' ही गर्जना करतच तिने युद्धाला तोंड दिले. इंग्रजांचा कर्दनकाळ ठरलेली ही राणी. 'झाशी' हे संस्थान राजा छत्रसालने झगडून मोगलांकडून मुक्त केलेले. यावेळी या राजाने शिवरायांना वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेतले होते. राणीनेही राजा छत्रसालसारखीच प्राणांची बाजी लावून लढा दिला. ग्वाल्हेरसंत बाबा गंगादास यांनी तिला शेवटचे 'पवित्र जल' दिले. दामोदर या दत्तक पुत्राच्या पाठीवरून हात फिरवून, 'मी माझा दामोदर तुमच्या हवाली करीत आहे,' असे रामचंद्र देशमुख यांना सांगून १८ जून, इ.स. १८५८ रोजी या महापराक्रमी राणीने अखेरचा श्वास घेतला. शिवरायांनी स्वराज्य स्थापन केले, पुढे अनेक वीरांनी त्याचे रक्षण केले; पण 'मराठी दौलती'तील या सर्व वीरांगनांनीही अतुलनीय पराक्रम गाजवून या हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले, हे इतिहास कधीही विसरणार नाही.

महाराष्ट्र विकास सेवा वर्ग १चे निवृत्त अधिकारी, कथालेखक, इतिहास अभ्यासक-लेखक गोपाळ देशमुख यांनी अशी मराठी दौलतीची नारी शिल्पं या पुस्तकात रेखाटली आहेत. पुस्तकातील पंधरा प्रकरणांतून मराठी सत्तेतील धडाडीच्या स्त्रियांची कर्तबगारी अभ्यासपूर्वक, ओघवत्या आणि प्रेरणादायी भाषेत सांगितली आहे.

◆

|| शि व छ त्र प तीं ची ||
स्वराज्याची संकल्पना

डॉ. जयसिंगराव पवार



शिवछत्रपतींच्या हिंदवी स्वराज्याचं स्वरूप व दिशा स्पष्ट करणाऱ्या लेखांचं संकलन

किंमत : २००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

बर्लिन गंगेला मिळाले

भा. द. खेर



हिंदू धर्मातील तत्त्वज्ञानाकडे आकर्षिलेल्या पाश्चात्त्य कुटुंबातील व्यक्तींचा जीवनसंघर्ष

किंमत : १८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध



खुजाबा

डॉ. संजय ढोले

कृत्रिम बुद्धिमत्ता... मेंदूतील स्मृती संचय...
जैवयंत्रमानवनिर्मित मानवी मेंदूचं प्रत्यारोपण...
विज्ञान संकल्पनांच्या प्रकाशझोतात घडणारं
मानवी भावभावनांचं रहस्यमय दर्शन

'खुजाबा' या विज्ञानकथासंग्रहात एकूण बारा कथा आहेत आणि प्रत्येक कथा ही स्वतंत्रपणे विज्ञान संकल्पना घेऊन पुढे आलेली आहे. या कथांमध्ये विज्ञान हाच खरा नायक असल्याने, विज्ञानाचा परिसस्पर्श जागोजागी जाणवेल यात शंका नाही. शिवाय, मूळ विज्ञानाच्या वाईटसाईट गोष्टींची उकल झाल्याचे निश्चितच दिसेल. असेही विज्ञान आहे, हा विचार या कथा अधोरेखित करू शकतील. 'अपहरण' ही कथा संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज या तंत्रज्ञानाच्या मुळाशी जाणारी व त्याचा व्याप मांडणारी आहे. तर 'आगंतुक' ही कथा अतिसूक्ष्म तंत्रज्ञानाचा उपयोग करून मानवाला संजीवनी देणारी व मानवी स्वभावाचे विघातक दर्शन घडवणारी आहे.

तसेच, 'साक्षीदार' ही कथा मृत व्यक्तीच्या मेंदूतील स्मृती संचयाचे चित्रण करणारी आहे. 'अज्ञात जीवाणू' ही कथा जीवाणूंच्या डीएनए व जनुकांचा अभ्यास करताना, परग्रहावरील जीवाणूच्या शोधाचा परिपाक आहे.

शिवाय, 'अपघात' ही कथा वैद्यकीय क्षेत्राशी नातं सांगणारी असून, त्यातील संघर्षासोबत जैवयंत्रमानवनिर्मिती व त्याच्या दुष्परिणामांची दखल घेणारी आहे. 'खुजाबा' ही कथा अतिसूक्ष्म तंत्रज्ञानाचा उच्चांक असून, प्रयोगशाळेत निर्माण केलेल्या अतिसूक्ष्म यंत्रमानवाने घेतलेली मोठी झेप आहे.

तर 'संकेत' ही कथा अंतराळाचा वेध घेणारी असून, कित्येक प्रकाशवर्षं दूरवर असणाऱ्या जीवसृष्टीचं कोडं उलगडणारी आहे. 'अगम्य' ही कथा नाभिकीय व किरण क्षेत्राशी निगडित असून, अपघाताने का होईना किरणांमुळे झालेल्या इजेमुळे जीवनदान मिळू शकते, याची प्रचिती देणारी आहे.

'शिखंडी' ही कथा मानवी मुळाशी असणाऱ्या डी.एन.ए.चा अभ्यास किरणांच्या साहाय्याने करताना, एका वेगळ्याच प्रजातीचा उगम होतो, हे सांगणारी आहे आणि 'अंधार गुणिले अंधार' ही कथाही मानवी जनुकांतील डी.एन.ए.च्या साखळ्या तोडून, हवा तसा गर्भ तयार करण्याच्या तंत्रावर आधारित आहे, जी मानवी नकारात्मकता दर्शविते. आणि तोच मोठा अनर्थ पुढे मानवच टाळतो. मानवी स्वभावाचे कंगोरे दर्शविणारी ही कथा आहे.

शिवाय, 'कलाटणी' ही कथा स्त्रीच्या मासिक स्रावाच्या माध्यमातून मिळवलेल्या मूळ पेशीवर आधारित असून, मानवी जीवनाला हातभार लावणारी व गैरसमज दूर करणारी आहे. आणि शेवटी 'कालचक्र' ही कथा मानवी मेंदूच्या प्रत्यारोपणाची असून, त्यातून विविध मानवी रहस्यं दर्शवणारी आहे.

'खुजाबा' विज्ञान कथासंग्रहातील या कथा मानवी गुणधर्म व स्वभावांसोबतच वेगवेगळ्या विज्ञानांतील संकल्पनांचा प्रवाह घेऊन आल्या आहेत. म्हणूनच या कथा एकविसाव्या शतकातील विज्ञानाच्या तर आहेतच; पण त्याचवेळी त्या भविष्यातील प्रत्यक्ष घडणाऱ्या व मानवी समाजासाठी उपयुक्त ठरणाऱ्या आहेत. शिवाय, मानवी स्वभावातील गुण व दोषांचे विविधांगी दर्शन घडवणाऱ्याही आहेत.

◆

नवी संहिता... नवा आशय...

सू - सू अंतराळवीर
आणि
फुलपाखरु

लेखक : **राजीव तांबे**

किंमत : **₹ १४०। बालसाहित्य**

बब्बडचं उष्टावण.... तिची बाहुली... तिचा पहिला वाढदिवस... तिची खेळणी.... बब्बडचे लोकरी कपडे... तिचं शॉपिंग... तिचा पाळणा... बब्बडने उच्चारला पहिला शब्द 'आई'... तर अशी ही बब्बडची रंगीत चित्रमय दुनिया

नवी संहिता... नवा आशय...

॥ सेतुबंधन ॥

भा. द. खेर

श्रीरामाच्या जीवनावरील आकर्षक,
मनोरंजक, रसपूर्ण कादंबरी



किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

सुखाचा लपंडाव

भा. द. खेर

स्वातंत्र्यपूर्व काळाच्या पार्श्वभूमीवर
प्रेमाच्या त्रिकोणातून साकारलेले
हृदयस्पर्शी भावनाट्य



किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

१६ डिसेंबर २२ ते १५ जानेवारी २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

खालील संचांवर १६ ते ३१ डिसेंबर दरम्यान खास सवलत

१६ डिसेंबर - जॅन येगर यांचा जन्मदिन

'मैत्री अशी आणि तशी', 'वर्क लेस, डू मोअर' या पुस्तकांवर विशेष सवलत

मूळ किंमत ५४५/- । सवलत किंमत ३९९/-

---

१६ डिसेंबर - विजय दिवस

'परमवीर चक्र' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १२९/-

---

२० डिसेंबर - मॅथ्यू ग्लास यांचा जन्मदिन

'एन्ड गेम', 'अल्टिमेटम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ५४९/-

---

२० डिसेंबर - प्रतिमा कुलकर्णी यांचा जन्मदिन

'रुजवाई' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-

---

२१ डिसेंबर - यू. आर. अनंतमूर्ती यांचा जन्मदिन

'संस्कार', 'अवस्था' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत २९०/- । सवलत किंमत १९९/-

---

२३ डिसेंबर - किसान दिवस

'आधुनिक द्राक्ष लागवड', 'विपुलाच सृष्टी', 'केल्याने होत आहे रे', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग', 'शेती करू फायद्याची', 'बोन्साय', 'घरातील बाग', 'छंद बागेचा', 'कॉर्पोरेटला रामराम शेतीला सलाम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत १९०५/- । सवलत किंमत १३३४/-

---

२४ डिसेंबर - मधुवंती सप्रे यांचा जन्मदिन

'लोकल माझी सखी','ध्यासपर्व' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत ३००/-

---

२४ डिसेंबर - सुरेशचंद्र नाडकर्णी यांचा जन्मदिन

'गज़ल', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'पृथ्वीवर माणूस उपराच', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ७८०/- । सवलत किंमत ४९९/-

---

२४ डिसेंबर - भारतीय ग्राहक दिन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या सर्व पुस्तकांवर (प्रत्येकी १ प्रत)

४०% सवलत.

ही सवलत नेट १५००/- व अधिकच्या खरेदीवर लागू.

(ही सवलत फक्त २४ डिसेंबर या एक दिवसासाठी आहे.)

---

२५ डिसेंबर - प्रज्ञा ओक यांचा जन्मदिन

'बुक मार्क' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-

---

२५ डिसेंबर - ख्रिसमस

बालसाहित्याच्या **१५००च्या** खरेदीवर **४०%** सूट

(ही सवलत फक्त २५ व २६ डिसेंबर या दोन दिवसांसाठी आहे.)

---

२८ डिसेंबर - बाबा आमटे यांचा जन्मदिन

'अमरगीत' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-

---

२८ डिसेंबर - जॉन ग्रे यांचा जन्मदिन

' 'स'सुखाचा', 'तो आणि ती', 'तुला आठवताना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ६०२/-

---

२८ डिसेंबर - डेव्हिड ॲलन यांचा जन्मदिन

'गेटिंग थिंग्ज डन' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-

२९ डिसेंबर - भावेश भाटिया यांचा जन्मदिन

'रुक जाना नही' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४५/-

३० डिसेंबर - जयसिंगराव पवार यांचा जन्मदिन

'आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध', 'छत्रपती संभाजी : एक चिकित्सा', 'मराठेशाहीचे अंतरंग', 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे', 'शिवछत्रपती एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास', 'समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती', 'क्रांतिसिंह नाना पाटील', 'वेध अमुच्या इतिहासाचा', 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ', 'व्यक्तिवेध : शरद पवार ते गोविंद पानसरे', 'युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी', 'शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना', 'राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय', 'दादाजी कोंडदेव कोण होता?' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६४६५/- । सवलत किंमत ४५२६/-

३१ डिसेंबर - मेगन चान्स यांचा जन्मदिन

'द स्पिरिच्युॲलिस्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-

खालील संचांवर १ते १५ जानेवारी २०२३ दरम्यान खास सवलत

१ जानेवारी - मायकेल गेट्स गिल यांचा जन्मदिन

'हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाइफ' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २१९/-

१ जानेवारी - तान त्वान एंग यांचा जन्मदिन

'द गिफ्ट ऑफ रेन' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २२९/-

१ जानेवारी - पॉल कार्सन यांचा जन्मदिन

'बिट्रेयल' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-

१ जानेवारी - ॲनी बरोज यांचा जन्मदिन

'गर्नसी वाचक मंडळ' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-

१ जानेवारी - नादिया मुराद यांचा जन्मदिन

'द लास्ट गर्ल' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-

१ जानेवारी - सॅम ख्रिस्टर यांचा जन्मदिन

'द स्टोनहेंज लेगसी' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-

३ जानेवारी - ग्रेटा थुनबर्ग यांचा जन्मदिन

'ग्रेटाची गोष्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १२५/- । सवलत किंमत ८९/-

३ जानेवारी - जसवंत सिंग यांचा जन्मदिन

'ए कॉल टू ऑनर', 'जिना' या पुस्तकांवर विशेष सवलत

मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ४७९/-

३ जानेवारी - राजेंद्र खेर यांचा जन्मदिन

'बिंदू सरोवर', 'उदयन' या पुस्तकांवर विशेष सवलत

मूळ किंमत ६४५/- । सवलत किंमत ४४९/-

३ जानेवारी - सावित्रीबाई फुले जयंती

'महात्मा (जोतिराव फुले)', 'मी मलाला', 'स्टोन्स इन्टू स्कूल', 'थ्री कप्स ऑफ टी', 'माय नेम इज परवाना' या पुस्तकांवर विशेष सवलत

मूळ किंमत १६८५/- । सवलत किंमत ९९९/-

४ जानेवारी - कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचा जन्मदिन

'मराठी भाषा उद्गम व विकास' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत १९९/-

---

७ जानेवारी - शोभा डे यांचा जन्मदिन

'सिलेक्टिव्ह मेमरी', 'स्पीड पोस्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत ७६०/- । सवलत किंमत ५०९/-

---

८ जानेवारी - स्टीफन हॉकिंग यांचा जन्मदिन

'जॉर्ज ॲन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स', 'जॉर्ज ॲन्ड द ब्ल्यू मून', 'जॉर्ज ॲन्ड द शिप ऑफ टाइम', 'जॉर्ज ॲन्ड द अनब्रेकेबल कोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत २६७०/- । सवलत किंमत १८७०/-

---

८ जानेवारी - मार्क व्हिक्टर हॅन्सन यांचा जन्मदिन

चिकन सूप मालिकेतील ६१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत १३३१०/- । सवलत किंमत ९३१७/-

---

९ जानेवारी - विल्बर स्मिथ यांचा जन्मदिन

'द सेव्हन्थ स्क्रोल' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २७९/-

---

९ जानेवारी - शोभा चित्रे यांचा जन्मदिन

'एक दिवस', 'पानगळीच्या आठवणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २४९/-

---

१० जानेवारी - निरंजन घाटे यांचा जन्मदिन

'आल्फ्रेड रसेल वॅलेस', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'असे घडले सहस्त्रक', 'असे शास्त्रज्ञ असे संशोधन', 'ज्ञानदीप', 'फार फार वर्षांपूर्वी', 'जिज्ञासापूर्ती', 'ज्याचं करावं भलं', 'पर्यावरण प्रदूषण', 'रोबॉट फिक्सिंग', 'शास्त्रज्ञांचे जग', 'स्वप्नचौर्य', 'तरुणांनो होशियार', 'वसुंधरा', 'वेध पर्यावरणाचा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५९०/- । सवलत किंमत २१५४/-

---

११ जानेवारी - अनू अगरवाल यांचा जन्मदिन

'अनू'प या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-

---

११ जानेवारी - वि. स. खांडेकर यांचा जन्मदिन

एकूण ११९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत १७,२१५/- । सवलत किंमत ११,१९०/-

---

१२ जानेवारी - स्वामी विवेकानंद जयंती व जागतिक युवा दिन

'आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'चिकन सूप टीनएज सोल', 'चिकन सूप टीनएज सोल भाग २', 'चिकन सूप टीन एज सोल भाग ३', 'मैत्री अशी आणि तशी', 'स्वामी विवेकानंद', 'टीनएजर्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

मूळ किंमत २२४५/- । सवलत किंमत १३४७/-

---

१२ जानेवारी - मृणालिनी गडकरी यांचा जन्मदिन

'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३०९/-

---

१४ जानेवारी - डेव्हिड कर्कपॅट्रिक यांचा जन्मदिन

'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २२९/-

◆

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा

या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com

TBC-31 Book No. 4

शल वी टेल द प्रेसिडेंट?

जेफ्री आर्चर

अनुवाद

स्नेहा केतकर

वाचकांच्या मनाची पकड घेत पानापानांतून उलगडत जाणारी रहस्यमय कादंबरी

किंमत : ४५०/-रु. TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत
पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

TBC-31 Book No. 5

ऑनर अमंग थीव्ज

जेफ्री आर्चर

अनुवाद

सई साने



जेफ्री आर्चरच्या खुमासदार शैलीत पानापानांतून उलगडत जाणारी उत्कंठावर्धक कादंबरी

किंमत : ७००/-रु. TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत
पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पद्मश्री सुधा मूर्ती
यांनी साधला
सांगलीकरांशी निखळ संवाद

दिलीपराज प्रकाशनातर्फे देण्यात येणाऱ्या ग्रंथोत्तेजक पुरस्काराने
ज्येष्ठ प्रकाशक **श्री. अनिल मेहता** यांचा गौरव

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/12/2022 Posting Date : 11/12/2022

नवीन संहिता... नवा आशय...









मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____

_____

_____

_____

_____

_____

_____